- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर
संचालक-संपादक : अजय बिवडे





**सोने-चांदी**

- २४ कॅरेट : १,४८,७०० /-
- २३ कॅरेट : १,४६,३५० /-
- चांदी : २,३८,३००/-


Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, २५ जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २२६ | किंमत : २ रूपये



**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**

नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...

- आजच संपर्क करा -

८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


# ३ पैकी २ मागण्या सरकारकडून मान्य
## सीजेपी धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्यावर ठाम



**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

राजधानी दिल्लीत आज (शुक्रवारी, ता २४) वेगाने घडणाऱ्या राजकीय घडामोडींदरम्यान केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा आणि जितेंद्र सिंह यांनी 'कॉकरोच जनता पार्टी'चे मुख्य प्रवक्ते सौरव दास आणि राष्ट्रीय प्रवक्ते आशुतोष रांका यांची भेट घेऊन चर्चा केली. नवी दिल्लीतील विठ्ठलभाई पटेल हाऊस येथे ही बैठक पार पडली. या उच्चस्तरीय बैठकीत दोन्ही बाजूंच्या नेत्यांनी अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. मात्र, या चचेर्चा अधिकृत आणि विशिष्ट अजेंडा अजून सार्वजनिक करण्यात आलेला नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, सीजेपीचे प्रतिनिधी आणि कार्यकर्ते सौरव दास व आशुतोष रांका यांनी सरकारच्या दोन महत्त्वाच्या अटी मान्य केल्यानंतरच या चर्चेत सहभागी होण्यास संमती दर्शवली. शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांवर आणि विद्यार्थ्यांवर कोणतीही कायदेशीर कारवाई (केसेस) केली जाणार नाही. अलीकडेच झालेल्या परीक्षांमधील गोंधळ/ गटबाजीमुळेबाधित झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना योग्य ती भरपाई दिली जाईल. या दोन अटींवर सरकारने सहमती दर्शवली असली, तरी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची आपली मुख्य मागणी उखढ ने अजूनही लावून धरली आहे.

दरम्यान, केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी म्हटले आहे की, आंदोलनकर्त्यांशी झालेल्या भेटीदरम्यान आम्ही त्यांचे सर्व म्हणणे ऐकून घेतले आहे. आमची त्यांच्यासोबतची बैठक जवळपास २ तास चालली. त्यांच्या ३ मुख्य मागण्या होत्या आणि परीक्षा पद्धतीत सुधारणेसाठी त्यांच्याकडून ५ सूचना देण्यात आल्या होत्या. नड्डा यांनी पुढे सांगितले की, आम्ही त्यांना स्पष्ट केले आहे की उद्या दुपारी आम्ही त्यांची पुन्हा भेट घेऊ आणि सरकारमध्ये यावर काय चर्चा झाली, याची संपूर्ण माहिती त्यांना देऊ.

**सोनम वांगचुक यांनी सोडले २६ दिवसांचे उपोषण**

दुसरीकडे, 'नीट' परीक्षांमधील गोंधळ आणि देशातील स्पर्धा परीक्षांच्या संपूर्ण प्रणालीत सुधारणा करण्याबाबत केंद्र सरकारकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी आपले २६ दिवसांचे आमरण उपोषण मागे घेतले आहे. गुरुग्राम येथील मेदांता रुग्णालयात केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा आणि डॉ. जितेंद्र सिंह यांच्या उपस्थितीत सोनम वांगचुक यांनी आपले २६ दिवस चाललेले हे उपोषण अधिकृतपणे मागे घेतले.

### एनटीएकडून ४७ अधिकारी बडतर्फ

भरती आणि परीक्षा व्यवस्थेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आणि एनटीएतील भ्रष्टाचार रोखण्यासाठी कठोर निर्णय घेतले जात आहेत. एनटीएन ४७ अधिकाऱ्यांना बडतर्फ केले आहे. नीटसह इतर राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांचे आयोजन करणाऱ्या एनटीएनं गैरप्रकारांबाबतची जबाबदारी निश्चित करण्यासाठी मोठं पाऊल उचललं आहे. एनटीएनं ४७ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना नोकरीतून बडतर्फ केलं आहे. पेपरफुटी आणि गैरप्रकारातील सहभागी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासोबत गुन्हे दाखल करण्याबाबत कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते. शिक्षण मंक्षालयाच्या सूत्रांच्या नुसार परीक्षा पद्धतीत पारदर्शकतेबाबत समझोता करणाऱ्यांना दोषींना कोणत्याही किंमतीवर सोडलं जाणार नाही.

### एनटीएची संरचना बदलली जाणार

शिक्षण मंत्रालयाच्या अधिकृत सूत्रांनुसार बडतर्फीर्ची कारवाई एनटीएचं प्रशासन आणि कामकाजाची रचना नव्यानं तयार केली जाणार आहे. गेल्या काही दिवसांपासून वादात अडकलेल्या एजन्सीच्या फेररचनेची कालमयार्दा निश्चित केली आहे. सरकार पुढील एक महिन्यात एनटीएची कार्यप्रणाली, अधिकाऱ्यांची जबाबदारी, अंतर्गत व्यवस्थापन पूर्णपणे बदललं जाईल. या मोठ्या बदलानंतर प्रमुख उद्देश देशातील स्पर्धा परीक्षा पूर्णपणे पारदर्शक आणि विश्वसनीय बनवणं आहे.

### जेपीएससीच्या ९ परीक्षा रद्द

**रांची :** झारखंड लोकसेवा आयोगमधील सुरू असलेल्या वादविवादादरम्यान, आयोगाचे अध्यक्ष एल. खियांग्ते यांचा राजीनामा राज्यपालांनी स्वीकारला आहे. त्याचबरोबर, आयोगाने झारखंड संयुक्त नागरी सेवा मुख्य परीक्षा (मेंस परीक्षा) सह एकूण ९ महत्त्वाच्या भरती परीक्षा पुढील आदेशापर्यंत स्थगित केल्या आहेत. २ जुलै २०२६ रोजी जाहीर झालेल्या १४ व्या संयुक्त नागरी सेवा (प्रारंभिक) परीक्षेच्या निकालानंतर अनेक उमेदवारांनी अनियमिततेचे आरोप केले. उमेदवारांचे म्हणणे आहे की कट-ऑफ गुण सार्वजनिक केले नाहीत, डटफ शीट आणि मूल्यांकन प्रक्रियेत पारदर्शकता नव्हती. याशिवाय, उमेदवारांना गुणही सांगितले नाहीत. जास्त गुण असल्याचा दावा करणाऱ्या काही उमेदवारांची निवड झाली नाही, तर कमी गुण असलेल्या उमेदवारांची निवड झाली.

जेपीएससीवर असाही आरोप आहे की आयोगाने अशा एजन्सीकडून अनेक परीक्षा घेतल्या जी उत्तर प्रदेशात ब्लॅकलिस्ट करण्यात आली होती. आयोगाच्या एका सदस्यानेही मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून परीक्षा प्रक्रियेच्या निष्पक्षतेबद्दल चिंता व्यक्त केली. वाद वाढल्यानंतर झारखंड सरकारने संपूर्ण प्रकरणाची चौकशी सीआयडीकडे सोपवली. सीआयडीने जेपीएससी कार्यालयासह अनेक ठिकाणी छापे टाकले. सीआयडीने चौकशीदरम्यान उप परीक्षा नियंत्रकासह परीक्षेशी संबंधित अनेक लोकांना अटक केली. असा आरोप आहे की परीक्षा संचालन आणि डेटा प्रोसेसिंगमध्ये गंभीर गडबड झाली. जेपीएससीने झारखंड संयुक्त नागरी सेवा मुख्य परीक्षा-२०२५ सह एकूण ९ भरती परीक्षा सध्या पुढे ढकलल्या आहेत. आयोगाने म्हटले आहे की, परीक्षांच्या नवीन तारखा लवकरच जाहीर केल्या जातील.

थोडक्यात

### आखातात प्रचंड तणाव

**वॉशिंग्टन :** आखातातील तणाव अत्यंत शिगेला पोहोचला असून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर आतापर्यंतचा सर्वात मोठा लष्करी हल्ला करण्याची धमकी दिली आहे. या हल्ल्याची तयारीही पूर्ण झाली असून फक्त निर्णय घेणे बाकी असल्याचे ट्रम्प म्हणाले. त्यामुळे जगभरात खळबळ उडाली आहे. आम्ही इराणवर एका महाकाय हल्ल्याचा विचार करत आहोत. हा हल्ला आजवरच्या कोणत्याही हल्ल्यापेक्षा मोठा असेल. मी या निर्णयाच्या अतिशय जवळ पोहोचलो असून आमची सर्व तयारी पूर्ण झाली आहे असा इशारा ट्रम्प यांनी एका मुलाखतीदरम्यान दिला. ट्रम्प यांच्या आवाहनावर इस्त्रायलदेखील या लष्करी कारवाईत सामील होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.




संपादकीय लेखणीतून...

# वेळ त्यांचा आणि यांचा

नीट पेपरफुटी प्रकरणावरून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत दिल्लीत आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमाराविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने तातडीची सुनावणी घेण्यास नकार दिला. यावेळी सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी केलेल्या टिप्पणीची मोठी चर्चा सुरू आहे. आमचा वेळ वाया घालवू नका आणि स्वतःचाही वेळ वाया घालवू नका. लाठीमाराचे व्हीडीओ पाहायला आमच्याकडे वेळ नाही अशा शब्दांत त्यांनी याचिकाकर्त्यांच्या वकिलांना सुनावले. 'कॉक्रोच जनता पार्टीच्या'वतीने काढण्यात आलेल्या संसद मोर्चा दरम्यान पोलिसांनी आंदोलक विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करत अमानुष मारहाण केल्याचा आरोप करत ही याचिका दाखल करण्यात आली होती. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी न्यायालयात बाजू मांडताना सांगितले की, विद्यार्थी नीट परीक्षा, नॅशनल टेस्टिंग एजन्सीतील सुधारणा आणि पेपरफुटी यासारख्या महत्त्वाच्या मुद्यांवर आंदोलन करत आहेत. पोलिसांच्या कथित क्रूरतेचे व्हीडीओ देखील आहेत. शक्य असल्यास या प्रकरणाची सुनावणी गुरुवारी करावी. त्यानंतर वकिलांनी पोलिस अत्याचाराचे व्हीडीओ दाखवण्याचा प्रयत्न केला असता, सरन्यायाधीशांनी त्यात रस नसल्याचे स्पष्ट करत सुनावणी तातडीने घेण्यास नकार दिला. दिल्लीमध्ये विद्यार्थी व तरुण आंदोलकांकडून काढण्यात आलेल्या मोर्चावर पोलिस व निमलष्करी दलाच्या जवानांकडून लाठीमार करण्यात आला. या कारवाईविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. बुधवारी सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर हा मुद्दा उपस्थित करण्यात आला. जंतरमंतरवर आधीच निदर्शने सुरू आहेत आणि पोलिस तिथे अत्यंत कठोर कारवाई करत आहेत. आंदोलकांवर अश्रुधुराचा वापर करण्यात आला,

असे याचिकाकर्त्यांच्या वकिलाने खंडपीठाला सांगितले. यावर सरन्यायाधीश सूर्य कांत म्हणाले, आमचा आणि तुमचा वेळ वाया घालू नका. तुमचा वेळ आमच्या वेळेपेक्षाही अधिक मौल्यवान आहे. त्यानंतरही याचिकाकर्त्यांच्या वकिलाने आपला युक्तिवाद सुरूच ठेवला. विद्यार्थी तीन अत्यंत महत्त्वाच्या मागण्या करत आहेत. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांना पोलिसांच्या क्रूरतेचा सामना करावा लागत आहे. माझ्याकडे त्यासंबंधी चित्रफिती आहेत. परवानगी मिळाल्यास त्या दाखवू इच्छितो, असे या वकिलाने सांगितले. त्यावर, आम्हाला चित्रफिती पाहण्यात रस नाही. ते पाहण्यासाठी वेळ नाही, असे सरन्यायाधीश म्हणाले. खरे पाहता, सर्वोच्च न्यायालयासमोर कामाचा डोंगर असतो, अनेक प्रकरणे त्यांना हाताळायची असतात. त्यामुळे लाठीमारासारख्या फालतू चित्रफिती पाहण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नसतो हे त्या वकिलाला कळावयास हवे होते. दरम्यान, दिल्लीत आंदोलकांवर पोलिसांकडून आणि बळाचा वापर केल्याचा आरोप करणाऱ्या दोन याचिकांवर दिल्ली उच्च न्यायालयाने बुधवारी केंद्र सरकार आणि शहर पोलिसांकडून उत्तर मागवले.

यायालयाने संबंधित अधिकाऱ्यांना पोलिस कारवाईशी संबंधित सर्व नोंदी (सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज आणि चित्रफिती) सुरक्षित ठेवण्याचे निर्देश दिले. याचा अर्थ असा की, दिल्ली उच्च न्यायालयाकडे सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज आणि चित्रफिती पाहण्यास वेळच वेळ आहे! न्यायालयाने या याचिकांवर केंद्र सरकार आणि पोलिसांना नोटीस जारी केली आणि चार आठवड्यांत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. आता आणखी एक प्रकरण बघा. वाढते वय, मूत्रपिंडाचा आजार आणि इतर व्याधींचा हवाला देत डोंबिवलीतील महापालिका रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिकांना मारहाण केल्याप्रकरणी अटकेत असलेला शिवसेना नगरसेवक रमेश म्हात्रे याने बुधवारी उच्च न्यायालयाकडे जामिनाची मागणी केली. त्यावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेल्या हल्ल्याचा न्यायालयाने संदर्भ दिला व डॉक्टरांवर हल्ला करताना आरोपी उत्साही दिसत होता, असा टोला लगावला. ७३ वर्षांचे म्हात्रे डॉक्टरांना मारहाण करताना २५ वर्षांचे दिसत होते असे न्यायालय म्हणाले. म्हणजे सीसीटीव्ही फुटेज बघण्यासाठी न्यायालयाकडे वेळ होता! थोडक्यात काय तर, छोट्यांचे छोटे आणि मोठ्यांचे मोठेच असते हे सर्वसामान्यांच्या लक्षात यायला हवे! म्हात्रेच्या जामिनावरील स्थगिती प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्या. गौतम अखंड यांच्या खंडपीठाने कायम ठेवली.

# अय्यरच्या पहिल्या विजयाचे श्रेय वैभव - मयंकला!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

१५ वर्षीय वैभव सूर्यवंशीच्या विक्रमी अर्धशतकामुळे आणि वेगवान गोलंदाज मयंक यादवच्या शानदार पुनरागमनामुळे, भारताने गुरुवारी हरारे स्पोर्ट्स क्लब येथे खेळल्या गेलेल्या तीन सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतील पहिल्या सामन्यात झिम्बाब्वेचा सात गडी राखून पराभव केला. श्रेयस अय्यरच्या कर्णधारपदाखालील भारताचा हा पहिला विजय असून, या विजयासह भारतीय संघाने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतलेल्या भारताने झिम्बाब्वेला २० षटकांत सात गडी गमावून १२५ धावांवर रोखले. प्रत्युत्तरात, भारताने १३.२ षटकांत तीन गडी गमावून हे लक्ष्य पूर्ण केले.

### वैभवने १९ चेंडूंमध्ये वादळ निर्माण केले

१२६ धावांचे लक्ष्य गाठताना, भारतीय संघाची सुरुवात खराब झाली आणि अभिषेक शर्मा अवघ्या एका धावेवर बाद झाला. मात्र, वैभव सूर्यवंशीच्या आगमनाने सामन्याचे चित्रच पालटले. या युवा डावखुऱ्या फलंदाजाने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला आणि झिम्बाब्वेच्या गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढवला.

वैभवने रिचर्ड नगारवा आणि ब्लेसिंग मुझारबानी यांसारख्या अनुभवी गोलंदाजांविरुद्ध शानदार फटकेबाजी केली. त्याने चार चौकार आणि चार षटकारांसह अवघ्या १९ चेंडूंमध्ये ५० धावा पूर्ण केल्या. त्याचे अर्धशतक अवघ्या १८ चेंडूंमध्ये पूर्ण झाले. अर्धशतक पूर्ण केल्यानंतर थोड्याच वेळात तो बाद झाला, पण तोपर्यंत सामना भारताच्या पूर्ण नियंत्रणात आला होता. त्याच्या बाद झाल्यानंतर, इशान किशनने २४ चेंडूंमध्ये ३५ धावांची उपयुक्त खेळी केली, तर कर्णधार श्रेयस अय्यर २४ चेंडूंमध्ये २८ धावांवर नाबाद राहिला. भारताने ४० चेंडू शिल्लक असताना लक्ष्य गाठले.

### वैभव सर्वात तरुण टी-२० आंतरराष्ट्रीय अर्धशतक करणारा खेळाडू ठरला

वैभव सूर्यवंशीने या सामन्यात अनेक विक्रम प्रस्थापित केले. वयाच्या १५ वर्षे आणि ११८ दिवसांत अर्धशतक झळकावून, तो टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पन्नास धावा करणारा जगातील सर्वात तरुण फलंदाज ठरला. त्याने जिब्राल्टरच्या लुईस ब्रूसचा (१६ वर्षे आणि ५६ दिवस) विक्रम मोडला.

वैभवने वयाच्या १५ वर्षे आणि ९९ दिवसांतच भारतासाठी आंतरराष्ट्रीय पदार्पण केले होते आणि सचिन तेंडुलकरला मागे टाकून सर्वात तरुण भारतीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू बनण्याचा मान मिळवला होता. इंग्लंड दौऱ्यावर सलग तीन छोटे डाव खेळल्यानंतर, हरारेमध्ये त्याने सिद्ध केले की त्याला भविष्यातील स्टार का मानले जाते. विशेष म्हणजे, याच मैदानावर त्याने यावर्षी १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात १७५ धावांची ऐतिहासिक खेळी केली होती आणि आता त्याने आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील पहिले अर्धशतकही झळकावले आहे.

### मयंक यादवचे संस्मरणीय पुनरागमन

जवळपास २१ महिन्यांनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करणाऱ्या वेगवान गोलंदाज मयंक यादवने आपले पुनरागमन खास बनवले. त्याने सामन्याच्या पहिल्याच चेंडूवर ब्रायन बेनेटला यष्टीरक्षक इशान किशनकरवी झेलबाद करून भारताला एक चांगली सुरुवात करून दिली. मैदानातील पंचांनी फलंदाजाला नाबाद दिले होते, परंतु डीआरएस घेतल्यानंतर निर्णय भारताच्या बाजूने लागला. यासह, मयंक टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्याच्या पहिल्याच चेंडूवर बळी घेणारा तिसरा भारतीय गोलंदाज ठरला. त्याच्या आधी, अर्शदीप सिंग (टी-२० विश्वचषक २०२४, अमेरिका विरुद्ध) आणि हार्दिक पांड्या (आशिया कप २०२५, पाकिस्तान विरुद्ध) यांनी हा पराक्रम केला होता.

ताशी १४५ किमी पेक्षा जास्त वेगाने सातत्याने गोलंदाजी करत, मयंकने चार षटकांत केवळ १८ धावा देऊन दोन बळी घेतले. त्याने आपल्या वेगाने दियान मायर्सलाही अडचणीत आणले आणि त्याला पॅव्हेलियनमध्ये परत पाठवले, ज्यामुळे दुखापतीतून परतल्यानंतर त्याने आपली तंदुरुस्ती आणि वेग या दोन्हींचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

### भारतीय गोलंदाजांनी दबाव वाढवला

भारतीय गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच झिम्बाब्वेवर दबाव कायम ठेवला. मयंक यादवने पहिल्याच चेंडूवर बळी घेतला, तर प्रिन्स यादवनेही उत्कृष्ट गोलंदाजी करत चार षटकांत १९ धावा देऊन दोन बळी घेतले. शिवम दुबे आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. पदार्पण करणाऱ्या अशोक शर्माने सुरुवातीच्या षटकांमध्ये धावा दिल्या, पण नंतर त्याने चांगले पुनरागमन केले.

झिम्बाब्वेची सुरुवात खराब झाली, त्यांनी ३२ धावांत आपले चार प्रमुख फलंदाज गमावले. ब्रायन बेनेट (०), बेन करन (१०), डियान मायर्स (६) आणि कर्णधार सिकंदर रझा (४) स्वस्तात बाद झाले. त्यानंतर रायन बर्ल (२६), वेस्ली माधेवेरे (३८) आणि ताडीवानाशे मारुमणी (२७ नाबाद) यांनी थोडा प्रतिकार केला, पण संघ २० षटकांत सात गडी गमावून केवळ १२५ धावाच करू शकला.

### श्रेयस अय्यरचा पहिला विजय

हा विजय कर्णधार श्रेयस अय्यरसाठीही खूप खास होता. आयर्लंड आणि इंग्लंडच्या दौऱ्यावर सलग सहा टी-२० सामने गमावल्यानंतर, भारताला अखेर त्याच्या कर्णधारपदाखाली पहिला विजय मिळाला. शिस्तबद्ध गोलंदाजी आणि वैभव सूर्यवंशीच्या स्फोटक फलंदाजीच्या जोरावर भारताने हा सामना एकतर्फी जिंकला आणि तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

विजय मिळवल्यानंतर, भारतीय कर्णधार श्रेयस अय्यर आपल्या संघाच्या कामगिरीवर अत्यंत खूश होता. कर्णधार म्हणून भारताला पहिला टी-२० आंतरराष्ट्रीय विजय मिळवून देणाऱ्या श्रेयसने, युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीच्या निर्भय फलंदाजीचे कौतुक केले. सामनावीर मयंक यादवने, जवळपास २१ महिन्यांनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये यशस्वी पुनरागमन करणे हा आपल्या कारकिदीर्तील एक अत्यंत खास क्षण असल्याचे म्हटले आहे. वैभवच्या विक्रमी अर्धशतकामुळे आणि मयंकच्या भेदक गोलंदाजीमुळे भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

### "देशाच्या विजयात योगदान देणे ही सर्वात खास भावना आहे"

सामनावीर ठरलेल्या मयंक यादवने सांगितले की, इतक्या प्रदीर्घ काळानंतर भारतीय संघात परत येऊन विजयात योगदान देणे ही त्याच्यासाठी एक खूप खास भावना आहे. तो म्हणाला, "देशाच्या विजयात योगदान देणे नेहमीच खूप छान वाटते. प्रदीर्घ काळानंतर परत येऊन संघाच्या विजयात भूमिका बजावणे हा माझ्यासाठी एक खूप अविस्मरणीय क्षण आहे."

### हरारेच्या खेळपट्टीने त्यांना चांगली साथ दिली

मयंक म्हणाला की, भारताच्या तुलनेत हरारेच्या खेळपट्टीवर त्यांना अधिक उसळी आणि स्विंग मिळाली. त्याने स्पष्ट केले की, सातत्याने चांगल्या लेंथवर गोलंदाजी करण्याची त्याची योजना होती आणि खेळपट्टीवरील अतिरिक्त उसळीने त्याला खूप मदत केली. या वेगवान गोलंदाजाने हे देखील मान्य केले की, संपूर्ण भारतीय वेगवान गोलंदाजी युनिटने सतत दबाव कायम ठेवला, ज्यामुळे झिम्बाब्वेला मोठी धावसंख्या उभारता आली नाही.

### श्रेयस म्हणाला, "गोलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी केली"

कर्णधार श्रेयस अय्यरने गोलंदाजांच्या कामगिरीचे वर्णन 'अपवादात्मक' असे केले. तो म्हणाला की, संघाला खेळपट्टीवर चांगल्या उसळीची अपेक्षा होती आणि मयंक यादवने नव्या चेंडूने त्याचा उत्कृष्टपणे फायदा घेतला. श्रेयस म्हणाला की, भारतीय गोलंदाजांनी फलंदाजांना मोकळेपणाने खेळण्याची कोणतीही संधी दिली नाही आणि आपल्या अचूक टप्पा व दिशा (लाइन अँड लेंथ) ने दबाव कायम ठेवला.

हंगामी प्रशिक्षक व्हीव्हीएस लक्ष्मण व नव्या चमूने गौतम गंभीरने गत महिन्यात गमावलेल्या तिनही मालिका पराभवांवर फुंकर घालून टिम इंडियात नवीन चैतन्य निर्माण केल्याने संघाला विजयी पथावर येण्यास मदत झाली. बीसीसीआयसनेही गंभीर आणि कंपनीला नारळ देऊन अनुभवी लक्ष्मणकडेच संघाची धुरा सोपावल्यास संघ पूर्वपदावर येण्यास वेळ लागणार नाही.

- ९०९६३७२०८२

# आजचा युवा

प्रतिभा पिटके
अमरावती

युवा हा केवळ उद्याचा नागरिक नसून समाजाचा भावी शिल्पकार असतो, तो देशाची ताकद असतो. देशाचे भविष्य त्याच्या हाती असते. पूर्वीपेक्षा आजचा तरुण अधिक शिक्षित, आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडलेला, नवीन विचारसरणीचा आहे, त्याच्यात भरपूर आत्मविश्वास, व नवीन शिकण्याची जिद्द आहे स्वतःचे करिअर बनविण्यासाठी त्याची धडपड कौतुकास्पद आहे महत्वाचे म्हणजे नवीन पिढीला सोशल मीडियाचे खूप आकर्षण आहे, वाढत्या लोकसंख्येमुळे देशात बेरोजगारीचे प्रमाणही खूप वाढलेले आहे त्यामुळे अनेक तरुणांमध्ये नैराश्य, असुरक्षितता व भविष्याची चिंता वाढलेली आहे.

पूर्वीच्या काळी एकत्र कुटुंब पद्धती असल्याने मुलावर लहानपणापासून चांगले संस्कार होत, भारत देशाला अध्यात्मिक सांस्कृतिक पौराणिक वारसा आहे. पूर्वी जीवनशिक्षणाचे धडे घरीच मिळत, आजच्या हम दो हमारे-- दो, एक ह्या वातावरणात मुले एकटी पडत आहेत. आजच्या धकाधकीच्या जीवनात आईवडील दोघेही कामात व्यस्त असल्याने अनेक मुलांना पुरेसा कौटुंबिक सहवास प्रेम वात्सल्य मिळत नाही, ज्या वयात त्यांना आईचा मायेचा पदर हवा असतो. वडिलांची शिस्त, अबोल प्रेम



हवे असते. त्यावेळी मुले केअरटेकर जवळ असतात, हे सत्य असले तरी त्यावर सहज उपाय नाही. आजच्या जीवनपद्धतीत पैशाला फार महत्व आहे, परंतु मुलांना भावनिक आधाराची नितांत गरज असते. याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जाते एका क्लिकवर जगाशी संवाद साधणारा आजचा युवा मनाने मात्र एकटा पडलेला, अनेक प्रश्नाशी झुंजणारा आहे त्यामुळे त्याला समजून घेणे फार आवश्यक आहे त्याचे दोष पाहण्यापेक्षा त्याला योग्य दिशा दाखविणे मार्गदर्शन करणे ही काळाची गरज आहे आजच्या युवाशक्तीवर विश्वास ठेवण्याची गरज आहे त्याला भावनिक आधार मिळाला. व त्याच्याजवळ असलेल्या उजेर्ला, त्याच्या कलागुणांना योग्य मूल्यांची जर जोड मिळेल तर भारताचे भविष्य अधिक समृद्ध होईल असे वाटते.

- ९४२१८२८४१३

# पंतप्रधानांच्या निवासस्थानापुढील निदर्शने आणि सुरक्षेचे आव्हान

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल,
वर्धा

भारताच्या शेजारी देशांमध्ये झेन जी ने ज्या पद्धतीने सरकार विरोधात आंदोलने केली व प्रधानमंत्र्यासह व नेत्यांना लक्ष करत सरकारला संत्ताच्युत करण्याचा जो हिंसात्मक प्रकार केला तसाच प्रकार भारताच्या प्रधानमंत्री आवासासमोर विरोध प्रदर्शन करण्याचा अनिष्ट प्रकार कॉंग्रेस व विरोधी पक्षांनी केला.

पंतप्रधानांच्या निवासस्थाना पुढील निदर्शने आणि सुरक्षेचे आव्हान ही लोकशाहीतील अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि राज्यप्रमुखांच्या सुरक्षेची गरज यांच्यातील नाजूक समतोलाची समस्या आहे.

निदर्शनांचे हिंसक वळण लागल्यास कायदे-सुव्यवस्था बिघडू शकते. शेजारील देशांमधील (उदा. श्रीलंका, बांगलादेश) अशांततेची उदाहरणे देऊन, कार्यकारी प्रमुखांच्या घरांना लक्ष्य करणे राजकीय अस्थिरतेस निमंत्रण ठरू शकते, अशी भीती तज्ज्ञांकडून व्यक्त केली जाते.

पंतप्रधानांच्या निवासस्थाना पुढील निदर्शने थेट लोकशाही प्रक्रिया आणि सुरक्षेसाठी गंभीर धोका मानली जातात. सर्वोच्च नेत्याच्या कार्यस्थानी होणाऱ्या अशा आंदोलनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो, सुरक्षेचे नियमभंग होतात आणि इतर देशांप्रमाणेच देशात राजकीय अस्थिरतेचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

नीट परीक्षा आणि पेपरफुटीच्या मुद्द्यावर विरोधी पक्षांच्या (कॉंग्रेस, समाजवादी पक्ष इत्यादी) खासदारांनी पंतप्रधानांच्या निवासस्थाना बाहेर आंदोलन केले होते या आंदोलनादरम्यान निदर्शने आणि पोलिसांमध्ये मोठी झडत होऊन अनेक नेत्यांना ताब्यात घेण्यात आले.

पंतप्रधानांच्या निवासस्थाना पुढील निदर्शने हा एक अत्यंत संवेदनशील विषय आहे, जो थेट देशाच्या सर्वोच्च नेत्याच्या सुरक्षेला आणि लोकशाहीच्या परंपरेला आव्हान देतो. लोकशाहीत आंदोलनाचा अधिकार असला, तरी अति-महत्त्वाच्या व्यक्तींच्या निवासस्थानी निदर्शने करणे अनेक सुरक्षा आणि राजकीय प्रश्न निर्माण करते. पंतप्रधानांचे निवासस्थान (हे अति-सुरक्षित क्षेत्र मानले जाते.येथे कडेकोट सुरक्षा व्यवस्था असते. निदर्शने किंवा गर्दीच्या वेळी सुरक्षा यंत्रणांवर मोठा ताण येतो आणि सुरक्षेत गंभीर त्रुटी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कार्यकारी प्रमुखांच्या घरापर्यंत मोर्चे नेणे किंवा घेराव घालणे, याला अनेक राजकीय विश्लेषक आणि सरकारी सूत्रांनी इतर देशांमधील अराजकतेची उदाहरणे देत अस्थिरतेचे लक्षण मानले आहे.

लोकशाहीत धोरणे, कायदे आणि नागरिकांच्या समस्यांवर चर्चा करण्यासाठी संसद आणि कायदेमंडळ ही मुख्य ठिकाणे आहेत. रस्त्यावर उतरून थेट पंतप्रधानांच्या निवासस्थानाला लक्ष्य करणे, संसदीय संस्थांच्या अधिकारांना कमी करते.

अनेकदा अशा निदर्शनांचा वापर राजकीय दबाव आणण्यासाठी केला जातो. अशा घटनांचा लोकशाहीच्या परिपक्वतेवर आणि राजकीय संस्कृतीवर नकारात्मक प्रभाव पडतो.

पंतप्रधानांच्या घराबाहेर जमावबंदी (कलम १४४) लागू असते. या परिसरामध्ये पाच किंवा त्यापेक्षा जास्त लोकांना एकत्र जमण्यास सक्त मनाई असते.कोणत्याही प्रकारची आंदोलने, धरणे किंवा निदर्शने करण्यास बंदी असते. सुरक्षेचा भाग म्हणून स्थानिक पोलिसांना संशयित हालचालींवर नियंत्रण ठेवण्याचे व अनधिकृत जमाव पांगवण्याचे पूर्ण अधिकार असतात. पंतप्रधानांचे घर किंवा संसदेच्या आसपासच्या परिसरात कोणत्याही प्रकारची धरणे आंदोलन, मोर्चे किंवा निदर्शने करण्यास परवानगी नसते. अशा आंदोलनांसाठी प्रशासनाने 'जंतर मंतर' किंवा इतर विशिष्ट जागा नेमून दिल्या आहेत. या परिसरात शांतता भंग होण्याची किंवा सुरक्षेला धोका निर्माण होण्याची शक्यता वाटल्यास, पोलिसांना तात्काळ कारवाई करण्याचे आणि संशयितांना ताब्यात घेण्याचे विशेष अधिकार असतात.

पंतप्रधानांचे निवासस्थान हा अत्यंत संवेदनशील आणि उच्च-सुरक्षा क्षेत्र असतो.अशा प्रकारची निदर्शने, जिथे थेट कार्यकारी प्रमुखांच्या घराला लक्ष्य केले जाते, ती एका परिपक्व लोकशाहीचे लक्षण मानली जात नाहीत. यामुळे देशात अस्थिरता वाढीस लागून चुकीचा पायंडा पडू शकतो. देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाच्या दैनंदिन आणि आपत्कालीन कामकाजावर विपरित परिणाम होतो. निदर्शने हिंसक वळण घेतल्यास मोठी जीवितहानी किंवा सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होण्याची भीती असते.

भारतात यापूर्वीही पंतप्रधान निवासस्थानाबाहेर आंदोलने आणि निदर्शने झाली आहेत. सुरक्षेच्या कारणास्तव पंतप्रधानांच्या निवासस्थाना भोवती (७, लोक कल्याण मार्ग किंवा पूर्वीचे ७, रेस कोर्स रोड) नेहमीच कडक बंदोबस्त असतो. तरीही भारताच्या राजकीय इतिहासात अशा अनेक मोठ्या घटना घडल्या आहेत, जेव्हा आंदोलकांनी थेट पंतप्रधानांच्या घराबाहेर किंवा त्याच्या अगदी जवळ जाऊन निदर्शने केली आहेत.

### भूतकाळातील काही प्रमुख आंदोलने:

१) अन्न सुरक्षा विधेयकासाठी आंदोलन (२०११): डिसेंबर २०११ मध्ये तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या निवासस्थानाबाहेर (७, रेस कोर्स रोड) सुमारे ३० कार्यकर्त्यांनी अन्न सुरक्षा विधेयक तातडीने मंजूर करण्याच्या मागणीसाठी अचानक आंदोलन केले होते. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीपूर्वी हे आंदोलन करण्यात आले होते, ज्यानंतर पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले होते.

### २) शीख विरोधी दंगल निकाल विरोध (२०१३):

मे २०१३ मध्ये, १९८४ च्या शीख विरोधी दंगलीतील एका प्रकरणातून कॉंग्रेस नेते सज्जन कुमार यांची निर्दोष मुक्तता झाल्यानंतर, संतापलेल्या आंदोलकांनी जंतर-मंतरवरून थेट तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या निवासस्थानाच्या दिशेने मोर्चा काढला होता. पोलिसांनी त्यांना संसद मार्ग पोलीस ठाण्याजवळ अडवले होते.

### ३) विरोधी पक्षांचे मोर्चे (२०२४/२०२६):

मार्च २०२४ मध्ये दिल्लीचे तत्कालीन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेच्या निषेधार्थ 'आप' समर्थकांनी पंतप्रधानांच्या निवासस्थानाकडे कूच करण्याचा प्रयत्न केला होता.

ही सर्व आंदोलने मोठ्या संख्येची नव्हती व हिंसक नव्हती,मात्र २१ जुलै २०२६ रोजी (आजच) नीट पेपर लीक प्रकरण आणि विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाईच्या निषेधार्थ विरोधी पक्षनेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे, प्रियांका गांधी आणि अखिलेश यादव यांच्यासह अनेक खासदारांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानाबाहेर अभूतपूर्व असे रस्त्यावर बसून 'धरणे आंदोलन' केले आहे.

लोकशाहीमध्ये नागरिकांना किंवा राजकीय पक्षांना शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करण्याचा आणि असहमती दर्शवण्याचा अधिकार असतो. मात्र, हा अधिकार वापरताना काही मर्यादा असणे आवश्यक आहे. संसदेचे अधिवेशन सुरू असताना किंवा गंभीर मुद्द्यांवर निदर्शने करण्यासाठी जंतर-मंतर किंवा नियुक्त केलेल्या अधिकृत जागांचा वापर करणे योग्य मानले जाते. धोरणात्मक निर्णय किंवा मंत्र्यांच्या राजीनाम्यासारखे प्रश्न थेट रस्त्यावर उतरून पंतप्रधानांच्या घराबाहेर मांडण्यापेक्षा संसदेत किंवा कायदेशीर मार्गांनी सोडवणे लोकशाहीच्या चौकटीत बसते. लोकशाहीत सरकारविरोधात आवाज उठवणे आणि निदर्शने करणे हा नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. मात्र, जेव्हा हे आंदोलन पंतप्रधानांसारख्या घटनात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तींच्या निवासस्थानापर्यंत पोहोचते, तेव्हा लोकशाही आंदोलनाचे रूपांतर अराजकतेत होत असल्याची चिंता व्यक्त केली जाते.

लोकशाहीचा पाया संवादावर आधारलेला असतो. आंदोलकांच्या मागण्या योग्य व्यासपीठावर (उदा. संसद, चर्चा) सोडवणे आणि सुरक्षा यंत्रणांनी आंदोलकांना प्रतिबंधित क्षेत्रापासून दूर शांततापूर्ण मार्गाने हाताळणे, ही खरी लोकशाहीची कसोटी मानली जाते.

- ९५६१५९४३०६

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

## दरेकसा परिसरात मलेरियाचा प्रादुर्भाव वाढला

# एक सी-६० पोलीस जवानासह चौघांची प्रकृती गंभीर; २५ जणांना संसर्ग

### तिघांना सालेकसा, तर एकाला गोंदिया येथे उपचारासाठी रेफर

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजू फुंडे**

सालेकसा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र दरेकसा अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये मलेरियाने पुन्हा एकदा डोके वर काढले असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आतापर्यंत २५ नागरिकांना मलेरियाची लागण झाल्याची नोंद झाली असून त्यापैकी एक सी-६० पोलीस जवानासह चौघांची प्रकृती गंभीर असल्याने तातडीने उपचारासाठी रेफर करण्यात आले आहे. संबंधित रुग्णांना पी.एफ. या घातक प्रकारच्या मलेरियाची लागण झाल्याची माहिती समोर आली आहे.

ग्रामीण रुग्णालय सालेकसा येथे रेफर करण्यात आलेल्या रुग्णांमध्ये निशा दिनेश मडावी (२८), रा. कोटीटोला (नवाटोला), मषिका चंद्रशेखर सिरजाम (२३), रा. कट्टीपार (मुरकुटडोह) तसेच सी-६० पोलीस कॅम्प, मुरकुटडोह येथील जवान पांडुरंग शेतोड (२९) यांचा समावेश आहे. तर



कोपालगड येथील सुभाष परते (३५) यांची प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना केटीएस रुग्णालय, गोंदिया येथे दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

छत्तीसगड व मध्यप्रदेशच्या सीमेवरील डोंगराळ आणि घनदाट जंगल परिसर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दरेकसा भागात दरवर्षी पावसाळ्यात मलेरियाचा प्रादुर्भाव वाढत असतो. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाययोजना, जनजागृती, सर्वेक्षण आणि औषध फवारणी यावर विशेष भर देणे आवश्यक असते. मात्र यंदा आरोग्य विभागाकडून अपेक्षित प्रमाणात जनजागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात आल्या नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. परिणामी मलेरियाचा संसर्ग झपाट्याने वाढून २५ जण बाधित झाले असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**लागणीनंतरच आरोग्य यंत्रणा सक्रिय?**

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, दरेकसा परिसर मलेरियाच्या दृष्टीने संवेदनशील क्षेत्र असूनही आरोग्य विभागाकडून पावसाळ्यापूर्वी जनजागृती शिबिरे, ग्रामभेटी किंवा प्रतिबंधात्मक उपायांबाबत पुरेसे मार्गदर्शन करण्यात आले नाही. आता संसर्ग वाढल्यानंतर आरोग्य कर्मचारी गावागावांत भेटी देऊन रुग्णांचा शोध घेत असून ही कारवाई उशिराने सुरू झाल्याची टीका होत आहे.

परिसरातील नागरिकांनी आरोग्य विभागाने तातडीने सर्वेक्षण मोहीम राबवून औषध फवारणी, रक्त तपासणी, डास नियंत्रण उपाययोजना आणि जनजागृती कार्यक्रम प्रभावीपणे राबवावेत, अशी मागणी केली आहे. तसेच परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः लक्ष घालण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## फळे व फुलांच्या आकर्षक सजावटीने श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर उजळले!

### निर्मल नगरीत आषाढी एकादशी निमित्ताने भव्य दिव्य सोहळ्याचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** उमरेड मार्गावरील निर्मल नगरी येथील श्री संत गजानन सेवा ट्रस्टतर्फे आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त शनिवार, २५ जुलै रोजी, श्री विठ्ठल- रुक्मिणी मंदिरात भव्य धार्मिक सोहळा आणि आकर्षक फळे व फुलांच्या सजावटीचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मंदिरात सुमारे १००० किलो, ताजी फळे आणि विविधरंगी फुलांनी मनमोहक सजावट करण्यात आली असून, या देखण्या सजावटीमुळे मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने नटला आहे. फळे, फुले आणि धार्मिक कलाकुसरीच्या संगमातून साकारलेली ही सजावट भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे.

यावेळी सकाळी ११ वाजता. महाआरतीचे आयोजन करण्यात आले असून, सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री विठ्ठल-रुक्मिणी व संत गजानन महाराजांचे दर्शन घेऊन महाआरतीत सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. आषाढी एकादशी हा वारकरी संप्रदायासाठी अत्यंत पवित्र आणि श्रद्धेचा दिवस मानला जातो. "माऊली" हा शब्द उच्चारताच भक्तांच्या अंतःकरणात प्रेम, श्रद्धा आणि भक्तिभाव जागृत होतो. याच भक्तीभावातून आयोजित करण्यात आलेला हा सोहळा सर्व भक्तांसाठी आध्यात्मिक आनंदाचा आणि प्रेरणादायी ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## स्मार्ट मीटर पोस्टपेडच राहणार; प्रीपेडची भीती निराधार : मुख्य अभियंता राजेश नाईक

### स्मार्ट मीटर बसविताना ग्राहकांमध्ये दहशत निर्माण करू नये, अखिल भारतीय ग्राहक पंचायतची ठाम मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्यभर सुरू असलेल्या स्मार्ट मीटर बसविण्याच्या मोहिमेबाबत ग्राहकांमध्ये निर्माण झालेल्या संभ्रम आणि भीतीच्या पार्श्वभूमीवर महावितरणचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी महत्त्वपूर्ण स्पष्टीकरण देत स्मार्ट मीटर हे पोस्टपेडच राहतील, ते प्रीपेड करण्यात येणार नाहीत, असे स्पष्ट केले. मात्र, स्मार्ट मीटर बसविताना ग्राहकांना २४ तासांच्या अल्टिमेटमच्या नोटिसा देऊन दहशतीचे वातावरण निर्माण करणे पूर्णपणे अयोग्य असून अशा प्रकारांना तातडीने आळा घालावा, अशी ठाम मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतने केली.

ग्राहक पंचायतच्या शिष्टमंडळाने महावितरणच्या मुख्य अभियंता राजेश नाईक यांची भेट घेऊन स्मार्ट मीटर संदर्भातील विविध तक्रारी आणि ग्राहकांच्या भावना त्यांच्यासमोर मांडल्या. यावेळी ग्राहकांना पाठविण्यात येणाऱ्या २४ तासांच्या नोटिसा, त्यातील कारवाईची भाषा आणि वीजपुरवठा खंडित करण्याच्या इशाऱ्यांमुळे ग्राहकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत



असल्याची बाब निदर्शनास आणून देण्यात आली. अशा प्रकारच्या नोटिसा नियमबाह्य असून त्या तातडीने थांबविण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली.

यावर प्रतिक्रिया देताना मुख्य अभियंता नाईक यांनी स्पष्ट केले की, स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांचे मीटर प्रीपेड होणार नाहीत. वीज बिलाची पद्धत पूर्वी प्रमाणेच पोस्टपेड राहणार आहे. स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना वीज वापराची आणि बिलाची अद्ययावत माहिती तत्काळ उपलब्ध होईल. त्यामुळे वीज वापरावर नियंत्रण ठेवणे, वीज बचत करणे आणि बिलांबाबत पारदर्शकता वाढण्यास मदत होईल. ते पुढे म्हणाले की, स्मार्ट मीटरमुळे वीज चोरीवर नियंत्रण ठेवण्यास मदत होणार असून, वीज चोरीस प्रोत्साहन देणाऱ्या किंवा सहकार्य करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल. ग्राहकांच्या शंका दूर करण्यासाठी महावितरण तर्फे विविध ठिकाणी जनजागृती कार्यक्रम आणि प्रात्यक्षिके आयोजित करण्यात येतील.

स्मार्ट मीटर आणि पारंपरिक मीटरमध्ये कोणताही आर्थिक तोटा ग्राहकांना होणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. स्मार्ट मीटर बसविण्याच्या सुरुवातीच्या काळात काही प्रमाणात विरोध होणे स्वाभाविक असले, तरी योग्य माहिती दिल्यानंतर तो कमी होत असल्याचा अनुभव असल्याचे सांगून, ग्राहकांनी अफवांवर विश्वास न ठेवता जनजागृती कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. ग्राहकांनी मागणी केल्यास अशा कार्यक्रमांबाबत महावितरण सकारात्मक निर्णय घेईल, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी सौरऊर्जा वापरणाऱ्या ग्राहकांनी वीज बचतीकडे अधिक लक्ष द्यावे, घरातील अर्थिंग व्यवस्थित आहे का, वायरिंगमध्ये दोष नाही ना, याची तपासणी करावी. अर्थिंग किंवा वायरिंगमधील दोषांमुळेही वीजबिल वाढू शकते, याकडेही मुख्य अभियंता नाईक यांनी लक्ष वेधले.

या शिष्टमंडळात अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे राष्ट्रीय सदस्य गजानन पांडे, नागपूर शहर कार्याध्यक्ष संजय धर्माधिकारी, नागपूर जिल्हाध्यक्ष गणेश शिरोळे, महानगर सचिव राजू पुरसेटकर, सहसचिव समीर जोशी यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. ग्राहक पंचायतने महावितरणला ग्राहकांशी सुसंवाद साधून स्मार्ट मीटर बाबतचे गैरसमज दूर करण्याचे तसेच स्मार्ट मीटर बसविताना कोणत्याही प्रकारची दडपशाही किंवा दहशतीचे वातावरण निर्माण होणार नाही, याची दक्षता घेण्याची मागणी केली आहे.

# कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल स्वतः उतरले चिखलात, आधुनिक यंत्राने केली धानाची रोवणी

### शेतकऱ्यांचा वेळ अन् पैसा वाचवणारे आधुनिक 'धान लागवड यंत्र', तुमान येथे प्रात्यक्षिक यशस्वी

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

शुक्रवार (ता.२४ जुलै ) रोजी कृषी अभियांत्रिकीकरण अभियानांतर्गत मौदा तालुक्यातील तुमान येथे आयोजित धान लागवड प्रात्यक्षिक व प्रशिक्षण कार्यक्रमास कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी उपस्थित राहून आधुनिक धान लागवड यंत्राचे प्रात्यक्षिक पाहिले तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधला.



यावेळी बोलताना राज्यमंत्री जयस्वाल यांनी सांगितले की, पावसावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना पाऊस पडल्यानंतर कमी कालावधीत धान लागवड करावी लागते. मात्र, त्यावेळी मजुरांची कमतरता भासत असल्याने मोठ्या अडचणी निर्माण होतात. या समस्येवर मात करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे ही काळाची गरज असून, त्यासाठी हे अत्याधुनिक धान लागवड यंत्र उपयुक्त ठरणार आहे.

हे आधुनिक तंत्रज्ञान प्रथमच या भागात प्रात्यक्षिक स्वरूपात पाहण्याची संधी मिळाली. चिखलमय शेतातही ही यंत्रसामग्री अतिशय सहजपणे कार्य करत असून कमी वेळेत, कमी मनुष्यबळात आणि अचूक पद्धतीने धान लागवड करण्याची क्षमता या यंत्रामध्ये आहे. याप्रसंगी स्वतः कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी या यंत्राच्या माध्यमातून धानाची रोवणी केली. भविष्यात यामध्ये आणखी संशोधन होऊन ही यंत्रणा अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त केला.

शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च, वेळ आणि श्रम यांची मोठ्या प्रमाणात बचत होणार असून त्याचा थेट फायदा उत्पादनवाढ आणि उत्पन्नवाढीत होईल. प्रत्यक्ष वापरातून या यंत्राचे आणखी फायदे समोर येतील आणि गावागावांतील युवकही या आधुनिक तंत्रज्ञानामध्ये पारंगत होतील.

राज्य शासन शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने विविध योजना राबवत आहे. मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना ही राज्यातील महत्त्वाकांक्षी योजना असून, तिची संकल्पना आपण रामटेक मतदारसंघात यशस्वीपणे राबविण्यात आलेल्या रामटेक पॅटर्नवर आधारित आहे. पूर्वी चिखलामुळे ज्या शेतात माणसालाही पोहोचणे कठीण होते, त्या ठिकाणी आज शेत पाणंद रस्त्यांमुळे ट्रॅक्टर आणि अन्य कृषी यंत्रसामग्री सहज पोहोचत आहे.

यासोबतच गावागावांत ड्रोन तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे, आधुनिक कृषी यंत्रसामग्रीचा प्रसार करणे आणि कृषी क्षेत्रात नवतंत्रज्ञानाचा वापर वाढविणे यावर शासन भर देत आहे, जेणेकरून शेतकरी अधिक



सक्षम आणि समृद्ध होतील.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषी विभागाचे मनःपूर्वक अभिनंदन केले तसेच उपस्थित सर्व शेतकरी बांधव-भगिनींचे आभार मानून त्यांच्या शेतीला अधिक प्रगत आणि फायदेशीर बनविण्यासाठी शासन कायम त्यांच्या पाठीशी राहील, अशी ग्वाही कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी दिली.

यावेळी उमेश घाटगे विभागीय कृषी सह संचालक, नागपूर विभाग, रविंद्र मनोहरे जिल्हा कृषी अधिकारी नागपूर, अर्चना कडू प्रकल्प संचालक आत्मा, नागपूर, धम्मजीत गजभिये ग्राम पंचायत तुमान सरपंच,प्रशांत भुरे शिवसेना मौदा तालुका अध्यक्ष,विकास चौधरी तंटामुक्ती अध्यक्ष ,ग्रिष्मा डेहणे उपविभागीय कृषी अधिकारी, रामटेक,माणिक पाटील तालुका कृषी अधिकारी मौदा,सुनील कोरटे तालुका कृषी अधिकारी रामटेक, प्रगतशिल शेतकरी

राहुल टाले,प्रसाद इडूपुघंटी, सुरेश कुथे,उमेश गायकवाड, गोपाल येंडापली, प्रल्हाद रंधई, सुनील पटिये, रामाराव येंडापली, कृषी उत्पन्न बाजार समिती मौदा संचालक तथा माजी सरपंच प्रमोद बरबटे,विनायक महादुले, सरपंच दुर्गेश पटिये,सुधीर भाकरे, राजकुमार भोयर, कैलास समरित, कैलास सोमनाथे, विकास झाडे यांच्यासह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थोडक्यात

## नीट पेपरफुटीप्रकरणी तुमसरात विद्यार्थ्यांचा आक्रोश मोर्चा



**दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर**

भंडारा जिल्ह्यातील तुमसर येथे आज दि.२४जुलै शुक्रवारला देशभर गाजत असलेल्या कथित नीट पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामाच्या मागणीसाठी व दिल्ली येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर अमानुष लाठीमार करण्याच्या निषेधार्थ मातोश्री लॉन तुमसर येथून मुख्य रस्त्याने तहसील कार्यालया पर्यंत रॅली काढून विद्याथार्नी तीव्र आक्रोश व्यक्त करत आंदोलन केले. जंतरमंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देत विद्यार्थ्यांनी केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी केली आणि लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली. आंदोलनकर्त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी ठएएळ पेपरफुटी प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, अशी ठाम मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात आली.देशभरातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या कथित गैरव्यवहारांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी यावेळी करण्यात आली. विद्यार्थ्यांकडून सरकार विरोधात नारेबाजी करण्यात आली.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी जंतरमंतर येथे न्यायासाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी-युवकांवर झालेल्या कथित लाठीमाराचा तीव्र निषेध नोंदविला.

**विद्यार्थ्यांच्या न्याय्य आणि शांततापूर्ण आंदोलनावर लाठीमार करणे ही लोकशाही मूल्यांना तडा**

देणारी बाब असून, लोकशाहीत विद्यार्थ्यांचा आवाज दडपण्याचा कोणालाही अधिकार नाही, असे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले.

देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित गंभीर प्रश्नांवर केंद्र सरकारने तातडीने उत्तर द्यावे. शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकता, निष्पक्षता आणि विद्यार्थ्यांचा विश्वास कायम ठेवण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी आंदोलनातून करण्यात आली. तहसील कार्यालय तुमसर येथे तहसीलदार उपस्थित नसल्यामुळे विद्यार्थ्यांनी निवेदन तुमसर चे उपविभागीय अधिकारी गणेश दिघे यांना दिले. यावेळी तुमसर तालुक्यातील विद्यार्थी व विद्यार्थिनी आणि  विविध पक्षांचे राजकीय नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे आंदोलन पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात शांततेत पार पडले.

## एस .एस .महात्मे संस्कार विहार शाळेत आषाढी एकादशी निमित्ताने दिंडी उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

एस.एस. महात्मे संस्कार विहार शाळेत आषाढी एकादशीनिमित्त पारंपरिक दिंडीचे आयोजन उत्साहात करण्यात आले. या दिंडीत विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल यांच्या भक्तीपरंपरेचे दर्शन घडविणाऱ्या या दिंडीमुळे संपूर्ण शाळा परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. विद्यार्थ्यांनी विठ्ठल नामाचा गजर करत भक्तीभावाने दिंडी काढली. कार्यक्रमात शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. दिंडीमुळे परिसरात आनंददायी व उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाचे संचालन सातवीतील अशिनी खोब्रागडे व शौर्य आंबिलहुके यांनी उत्कृष्टरीत्या केले, तर आभार प्रदर्शनही त्यांनीच सादर केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी शाळेचे कौतुक केले.

## पोलीस कर्मचारी आनंद भांडारकर यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

आमगाव तालुक्यातील अंजोरा येथील हाल मुक्काम नारायण नगरातील पोलीस कर्मचारी स्वर्गीय आनंद कवळूजी भांडारकर



यांचे दीर्घ आजाराने शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ रोजी दुपारी १.३० वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे पोलीस विभागासह परिसरात शोककळा पसरली असून, अनेक सहकारी, मित्रपरिवार व नागरिकांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. स्व. आनंद भांडारकर यांच्यावर शनिवार, दि. २५ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आमगाव-गोंदिया मार्गावरील मोक्षधाम, रिसामा येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## उत्कृष्ट कार्य करणाऱ्या माजी सैनिक व पाल्यांसाठी विशेष गौरव पुरस्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विविध क्षेत्रात  अति उत्कृष्ट कार्य करणाऱ्या माजी सैनिक/माजी सैनिक विधवा पत्नी/पाल्य सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये दहावीच्या परीक्षेत ९० टक्के व बारावीच्या परीक्षेत ८५ टक्केपेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. सोबतच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू पुरस्कार, साहित्य, संगीत, गायन, वादन, नृत्य व पुरस्कार यशस्वी उद्योजक संघ संगणक क्षेत्रात अतिउत्कृष्ट कामगिरी, पूर/जळीत/दरोडा / अपघात, नैसर्गिक आपत्तीमध्ये बहुमूल्य कामगिरी, देश/राज्याची प्रतिष्ठा वाढवतील अशा स्वरूपाचे काम करणारे माजी सैनिक/विधवा पत्नी/पाल्य आदींना एकरकमी रुपये २० हजार ते १ लाख रुपयांपर्यंत विशेष गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. अशा माजी सैनिक/पत्नी/पाल्यांनी या संधीचा लाभ घ्यावा. विशेष गौरव पुरस्कार जिल्हा सैनिक कल्याण विभाग पुणे, यांच्यामार्फत प्रदान करण्यात येणार आहे तरी अर्जाचा नमुना व माहिती जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात उपलब्ध आहे.

थोडक्यात

## काटोल येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना पुण्यतिथी निमित्य अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

नुकताच मंजुळाबाई वानखेडे बहुउद्देशीय संस्था काटोल व नारी शक्ती संघटना,काटोल यांचेवतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या ५७ व्या पुण्यतिथीचा कार्यक्रम धंतोली काटोल येथे पार पडला. याप्रसंगी प्रा.राहुल हिवराळे,पुतळा सम्राट नितीनजी तायवाडे,राजुजी वानखेडे,सचिव मंजुळाबाई वानखेडे बहुउद्देशीय संस्था काटोल यांनी कष्टकरी शेतकरी, कामगार हे समाजाचे खरेआधारस्तंभ आहे असे सबोधले. सामाजिक कार्यकर्ता प्रतापसिंग खरपूरिया आणि उपस्थित पाहुण्यांनी लोक शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर प्रकाश टाकून महिलांच्या शासकीय व इतर योजनानबाबत संबोधित केले. कार्यक्रमाचे संचालन यमुना पेरोडिया यांनी केले.या संघटनेच्या अध्यक्षा विजयालक्ष्मी खरपुरीया, उपाध्यक्ष,रंजना वंजारी, चित्रा राऊत, छकुली कुंभारे, सारीका यावलकर,सुषमा राठोड,नंदा इंगळे, संजना राठोड, दमयंती पराडे, वनिता राऊत, रेखा मनोहर, सीमा वानखेडे, वर्षा तायवडे आदी सर्व महिला उपस्थित होत्या.

## अखेर तारसा येथील कमी उंचीच्या पुलामुळे पावसाळ्यात वाहतूक बंद होण्याची समस्या सुटली!

### नवीन बांधकाम केलेल्या मोठ्या पुलावरून वाहतूक सुरू, तारसा - धामणगाव जि प क्षेत्रातील भाजपचे जि. प चे भावी उमेदवार व माजी सरपंच आनंद लेंडे यांच्या सतत पाठपुराव्याला यश



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

तीन दिवसांपूर्वी सुरू असलेल्या सततधार पावसाने तारसा येथील जुन्या कमी उंचीच्या पुलावरून सांड नदीचे पाणी वाहायला सुरुवात झाली होती, मात्र यंदापासून तारसा येथील कमी उंचीच्या पुलावरून पाणी वाहू लागताच मागील अनेक वर्षापासूनची वाहतूक बंद होण्याची समस्या नवीन पुलाचे बांधकाम पूर्ण झाल्याने व त्यावरून आठ दिवसापूर्वीच वाहतूक सुरू झाल्याने अखेर बंद झालेली आहे.

तारसा येथून वाहणाऱ्या सांड नदीवर कमी उंचीच्या पुलाऐवजी मोठ्या नवीन पुलाचे बांधकाम करण्यासाठी नऊ वर्षापूर्वीपासून तारसा - धामणगाव जिल्हा परिषद क्षेत्रातील भाजपचे जिल्हा परिषदेचे भावी उमेदवार तारसा ग्रामपंचायतचे माजी सरपंच आनंद लेंडे हे चार वर्षांपूर्वी सरपंच असताना व आता चार वषार्पासून त्यांची पत्नी तारसा ग्रामपंचायत सरपंचा वैशाली आनंद लेंडे उपसरपंच चंद्रशेखर गभने,समस्त ग्रामपंचायत सदस्यगण यांनी महसूल मंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्याकडे लेखी ठराव देऊन, सतत पाठपुरावा केल्याने मोठ्या पुलाचे बांधकाम मंजूर होऊन,काम पूर्ण होऊन वाहतूकही सुरू झाली असल्याने तारसा व परिसरातील नागरिकांनी तारसा - धामणगाव जि प क्षेत्रातील भाजपचे जिल्हा परिषदेचे भावी उमेदवार व माजी सरपंच आनंद लेंडे,मंत्री बावनकुळे व मंत्री जयस्वाल यांचे आभार मानले.

## वाडीत रविवारी सर्वपक्षीय मोर्चा

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर झालेल्या पोलिस लाठीमाराचा निषेध व केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी रविवारी वाडीत सर्वपक्षीय मोचार्चे आयोजन करण्यात आले आहे. वाडी विकास संघर्ष आघाडीच्या पुढाकाराने दत्तवाडी येथील शुभम मंगल कार्यालयात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मोर्चा अमरावती महामार्गावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथून सुरू होऊन वाडी पोलीस ठाण्यात निवेदन देऊन समाप्त होणार आहे.

या मोर्चात वाडी, दवलामेटी, लाव्हा, आठवा मैल व सोनेगाव परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सर्वपक्षीय कृती समितीने केले आहे. बैठकीचे संचालन मधु माणके पाटील यांनी तर आभार प्रकाश कोकाटे यांनी मानले.

## 'वन लाइफ, वन पार्टनर' कार्यशाळा उद्या

### लाईफ कोच संदीप अग्रवाल यांचे मार्गदर्शन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अखिल भारतीय महिला परिषद, नागपूर शाखा पूर्व विदर्भ महिला परिषद आयोजित 'वन लाइफ, वन पार्टनर' या विषयावरील विशेष कार्यशाळेचे आयोजन रविवार, २६ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता कै. अनुसयाबाई काळे स्मृती सदन, न्यू रामदासपेठ येथे करण्यात आले आहे. १८ ते २६ वयोगटातील महाविद्यालयीन विद्यार्थिनी व नोकरदार महिलांसाठी आयोजित या कार्यशाळेत निरोगी नातेसंबंध, भावनिक सक्षमीकरण, करिअर आणि नातेसंबंधातील समतोल तसेच योग्य जीवनसाथीची निवड या विषयांवर उद्योजक व रिलेशनशिप मार्गदर्शक संदीप अग्रवाल मार्गदर्शन करतील. कार्यक्रमाला पूर्व विदर्भ महिला परिषद अध्यक्ष सौ नूतन कोळस्कर, उपाध्यक्ष सौ अनसूया काळे छाबरानी, सचिव सौ संगीता भावे तसेच इतर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# युवकांसाठी रोजगाराभिमुख नि:शुल्क कौशल्य प्रशिक्षणाची नवी संधी

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्या नागपूर स्किल सेंटरचे उद्घाटन, एआयडी, टाटा स्ट्राईव्ह, मनपा आणि विदर्भ ग्लोबल फाउंडेशनचा संयुक्त उपक्रम




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भातील उद्योगांना आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने उभारण्यात आलेल्या नागपूर स्किल सेंटरचे उद्घाटन रविवार, दि. २६ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार आहे. पारडी येथील प्रजापती नगर मेट्रो स्टेशनजवळील कौशल्य विकास केंद्रात हा भव्य उद्घाटन सोहळा पार पडणार आहे.

असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (एआयडी) या संस्थेने अध्यक्ष आशिष काळे यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शन व दूरदृष्टीतून या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची संकल्पना साकारली आहे. टाटा स्ट्राईव्ह, नागपूर महानगरपालिका, स्किल इंडिया अभियान आणि विदर्भ ग्लोबल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हे अत्याधुनिक कौशल्य विकास केंद्र उभारण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर निता ठाकरे राहतील. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, राज्यसभा सदस्य माया इवनाते, सर्व आमदार, विधान परिषद सदस्य, मनपा आयुक्त डॉ. विपीन व जिल्हाधिकारी श्री कुमार आशीर्वाद यांच्यासह नागपूर महानगरपालिकेचे पदाधिकारी आणि अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**उद्योगांच्या गरजेनुसार कौशल्य विकास**

सुमारे ३० हजार चौरस फूट क्षेत्रफळाच्या आणि १.२५ एकर परिसरात उभारण्यात आलेल्या या आधुनिक स्किल सेंटरमध्ये दरवर्षी सुमारे २००० युवकांना प्रशिक्षण देण्याची क्षमता आहे. उद्योगांच्या गरजेनुसार रोजगाराभिमुख कौशल्य प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास, प्लेसमेंट सहाय्य आणि उद्योजकता विकास या माध्यमातून युवकांना रोजगारक्षम बनविण्याचा या केंद्राचा उद्देश आहे.

**विविध रोजगाराभिमुख अभ्यासक्रम**

या केंद्रात १० वी, १२ वी उत्तीर्ण तसेच पदवीधर युवक-युवतींसाठी नि:शुल्क विविध अल्पकालीन कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आले आहेत. अनेक अभ्यासक्रमांमध्ये ऑन-द-जॉब प्रशिक्षण, तसेच संगणक आणि इंग्रजी प्रशिक्षण दिले जाणार आहे.

१० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी फूड अँड बेव्हरेज सर्व्हिस स्टीवर्ड, असिस्टंट इलेक्ट्रीशियन, जनरल ड्युटी असिस्टंट, फिल्ड टेक्निशियन सोलर पीव्ही इन्स्टॉलर (सूर्यमित्र) हे अभ्यासक्रम तर बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी फ्रंट ऑफिस असोसिएट, क्वीक सर्विस रेस्टॉरंट एक्झीकेटीव आणि पदवीधरांसाठी बिझनेस डेव्हलपमेंट एक्झिक्युटिव्ह, यूआय/यूएक्स डिझायनर हे अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. जनरल ड्युटी असिस्टंट अभ्यासक्रमासाठी २० ते ४५ वर्षे, तर इतर सर्व अभ्यासक्रमांसाठी १८ ते ३५ वर्षे वयोमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

**उद्योगांना मिळणार प्रशिक्षित मनुष्यबळ**

नागपूर स्किल सेंटर विदर्भातील औद्योगिक विकासाला चालना देणारे आणि उद्योगांना आवश्यक असलेले प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देणारे महत्त्वाचे केंद्र ठरणार आहे. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

नि:शुल्क प्रवेशासाठी व अधिक माहितीसाठी नागपूर स्किल सेंटर, पहिला मजला, कौशल्य विकास केंद्र, पारडी अग्निशमन दल कार्यालयासमोर, प्रजापती नगर मेट्रो स्टेशनजवळ, नागपूर येथे रुपेश - ८३२९२४७२८८, अविनाश - ९१६८४९८२३५, सुमीत - ८८५५८९१४०४ यांच्याशी संपर्क साधावा.पत्रकार परिषदेला असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट चे अध्यक्ष आशिष काळे, सचिव डॉ. विजय कुमार शर्मा, पदाधिकारी संजय गुप्ता, अशोक गोयल, विनोद तांबी, महेश साधवानी, सीइओ कपिल चंद्रयान, पंकज भोकरे यांची उपस्थिती होती.

## आठवडी बाजारात सर्वत्र चिखलच-चिखल

### ३उन्हाळ्यात काढली झोप, पावसाळ्यात सुरू केले काम३, बाजारातील मुरूम-माती गेली कुठे?; व्यापारी व नागरिकांचा सवाल



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

शहरातील आठवडी बाजार परिसरात सुरू असलेल्या बांधकामामुळे संपूर्ण परिसर चिखलमय झाला असून व्यापारी, शेतकरी आणि ग्राहकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्याच्या तोंडावर कामे सुरू केल्याने बाजार परिसरात जागोजागी चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. परिणामी बाजारात येणाऱ्या नागरिकांना चालणे कठीण झाले असून अनेक ठिकाणी घसरून किरकोळ अपघात होण्याचाही धोका निर्माण झाला आहे.

बाजारातील ओटे आणि रस्त्यांच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात उत्खनन करण्यात आले. या उत्खननातून निघालेला मुरूम आणि माती कुठे आणी कुणाच्या आदेशाने वापरण्यात आली, याबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात असून याची चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

विशेष म्हणजे, उन्हाळ्याच्या चार महिन्यांत ही कामे पूर्ण करता आली असती. मात्र त्या काळात कोणतीही हालचाल न करता थेट पावसाळ्यात कामांना सुरुवात करण्यात आली. त्यामुळे अर्धवट कामे, उकरलेले रस्ते आणि सर्वत्र चिखल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. नियोजनाच्या अभावामुळे व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून ग्राहकांची संख्याही घटल्याचे व्यापारी सांगत आहेत.

भाजीपाला, धान्य, किराणा, कपडे तसेच अन्य वस्तू विकणाऱ्या व्यापाऱ्यांना चिखलामुळे दुकान मांडणेही कठीण झाले आहे. बाजारात येणाऱ्या शेतकऱ्यांनाही माल आणणे-नेणे त्रासदायक ठरत आहे. महिलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनाच चिखलातून वाट काढावी लागत असल्याने नगरपंचायत प्रशासनाविषयी तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

नागरिकांचा आरोप आहे की, बाजारातील विकासकामे दर्जेदार आणि नियोजनबद्ध करण्याऐवजी घाईघाईत सुरू करण्यात आली. पावसाचे कोणतेही नियोजन न करता कामे सुरू केल्याने नागरिकांना त्याची मोठी किंमत मोजावी लागत आहे. एवढी गंभीर परिस्थिती असतानाही नगरपंचायत प्रशासनाने कोणतीही पर्यायी व्यवस्था केलेली नाही.

आठवडी बाजारातील ही परिस्थिती पाहता, "विकासाच्या नावाखाली नागरिकांना चिखलात लोटण्याचे काम नगरपंचायत प्रशासन करत आहे का?" असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

तातडीने मुरूम टाकून बाजार परिसर चिखलमुक्त करावा, कामाचा दर्जा तपासावा तसेच उत्खननातून निघालेल्या मुरूम-मातीची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा व्यापारी व नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही देण्यात येत आहे.

## 'फील द बर्न फिटनेस'च्या वर्धमाननगरच्या प्रीमियम शाखेचे रविवारी नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

'फील द बर्न फिटनेस' च्या वर्धमान नगर येथील नव्या प्रीमियम शाखेची अधिकृत घोषणा आज आयोजित पत्रपरिषदेत करण्यात आली. यावेळी संस्थापक आशीष जैस्वाल अभिषेक जैस्वाल यांनी नवीन शाखेची माहिती देत, रविवारी (दि. २६ जुलै) होणाऱ्या भव्य उद्घाटन सोहळ्याची रूपरेषा जाहीर केली ते म्हणाले की, वर्धमान नगर येथील मेहता पेट्रोल पंप वर्धमान नगर इमारतीच्या पहेलिया मजल्यावर साकारण्यात आलेल्या या अत्याधुनिक जिमचे उद्घाटन केंद्रीयमंत्री नितीनजी गडकरी यांच्या शुभ हस्ते होणार असून, यावेळी महाराष्ट्राचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर निताताई ठाकरे, विशेष पाहुणे आमदार मोहन मते आमदार प्रविण दटके, आमदार कृपाल तुमाने, दयाशंकर तिवारी, विक्की कुकरेजा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहतील.

सुमारे ७ हजार चौरस फूट क्षेत्रात उभारण्यात आलेल्या या प्रीमियम फिटनेस सेंटरमध्ये अत्याधुनिक व्यायाम साहित्य, अनुभवी प्रशिक्षक, आइस बाथ, स्टीम रूम तसेच आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी आणि लहान मुलांसाठीही विशेष प्रशिक्षण सुविधा येथे उपलब्ध असतील, अशी माहिती पत्र परिषदेत देण्यात आली. या उद्घाटन सोहळ्यास नागपूरकर नागरिक, फिटनेसप्रेमी तसेच प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थापक आशीष जैस्वाल, अभिषेक जैस्वाल व व्यवस्थापक कुलदीप चिकाने यांनी केले. परिषदेला शुभांगी वानखेडे, मेरी लुईस, अमोल गीते, योगेश दोदेवार, अभिजीत यादव, रोहित मरस्कोल्हे, योगिता बरडे आणि दासू हुमणेवार यांची उपस्थिती होती.

# नरखेड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा सलाईनवर!

### ३०२ मंजूर शिक्षक पदांपैकी ७५ पदे रिक्त; ७६ शाळांपैकी ३५ ते ४० शाळा एकशिक्षकी, दहा केंद्र प्रमुखांपैकी पाच पदे रिक्त; केवळ पाच स्वयंसेवकांच्या भरवशावर शिक्षण व्यवस्था, सहा हजारांहून अधिक विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण व्यवस्थेची अवस्था दिवसेंदिवस गंभीर होत असून शिक्षकांच्या तीव्र तुटवड्यामुळे ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे. शासनाकडून गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या घोषणा केल्या जात असताना प्रत्यक्षात मात्र अनेक शाळा शिक्षकांविना चालत असल्याचे वास्तव समोर आले आहे.

तालुक्यात ३०२ शिक्षक पदे मंजूर असताना केवळ २२७ शिक्षक कार्यरत असून तब्बल ७५ शिक्षक पदे रिक्त आहेत. परिणामी ७६ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांपैकी ३५ ते ४० शाळांचा कारभार केवळ एका शिक्षकाच्या भरवशावर सुरू आहे. एकाच शिक्षकाला सर्व वर्गांचे अध्यापन, शालेय प्रशासन, ऑनलाइन कामकाज, शासनाच्या विविध योजना, सर्वेक्षण, निवडणूक तसेच इतर प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागत असल्याने विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे.

शिक्षकांची कमतरता भरून काढण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने संपूर्ण नरखेड तालुक्यासाठी केवळ पाच स्वयंसेवकांची नियुक्ती केली आहे. एवढ्या मोठ्या तालुक्यासाठी पाच स्वयंसेवक देऊन प्रशासनाने पालकांच्या जखमेवर मिठ चोळण्याचे काम केले, अशी संतप्त प्रतिक्रिया पालक व शिक्षणप्रेमींमधून व्यक्त होत आहे.



याशिवाय शैक्षणिक प्रशासनही विस्कळीत झाले आहे. दहा केंद्र प्रमुख पदांपैकी पाच पदे रिक्त असल्यामुळे एका केंद्र प्रमुखाकडे दोन ते तीन केंद्रांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. त्यामुळे शाळांचे शैक्षणिक मार्गदर्शन, तपासणी व नियोजनावरही परिणाम होत असल्याचे चित्र आहे.

एकशिक्षकी शाळांमुळे विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होत नाही. सर्व वर्गांना एकाचवेळी शिकविण्याची वेळ शिक्षकांवर येत असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणापासून वंचित राहावे लागत असल्याची खंत पालक व्यक्त करीत आहेत.

**शेतकरी संघटनेचा सरकारला इशारा**

या गंभीर परिस्थितीवर प्रतिक्रिया देताना क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे नागपूर जिल्हाध्यक्ष सागर दुधाने म्हणाले, "शेतकऱ्यांच्या मुलांचे भविष्य घडविणाऱ्या जिल्हा परिषद शाळांची आज अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. नरखेड तालुक्यात ३०२ मंजूर शिक्षक पदांपैकी ७५ पदे रिक्त असणे ही शासन आणि शिक्षण विभागाची मोठी अपयशी बाब आहे. ३५ ते ४० शाळा एका शिक्षकाच्या भरवशावर चालत असतील तर विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण कसे मिळणार? केवळ पाच स्वयंसेवक देऊन प्रशासनाने जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला आहे. शासनाने तातडीने शिक्षक व केंद्र प्रमुखांची रिक्त पदे भरावीत. अन्यथा पालक, ग्रामस्थ व विविध सामाजिक संघटनांना सोबत घेऊन तीव्र लोकआंदोलन उभारण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी तडजोड कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही."

**नरखेड तालुक्यातील शिक्षण व्यवस्थेची वस्तुस्थिती**

मंजूर शिक्षक पदे : ३०२
कार्यरत शिक्षक : २२७
रिक्त शिक्षक पदे : ७५
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा : ७६
एकशिक्षकी शाळा : ३५ ते ४०
केंद्र प्रमुख पदे : १०
रिक्त केंद्र प्रमुख पदे : ५
नियुक्त स्वयंसेवक : फक्त ५

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने तातडीने शिक्षक भरती करून रिक्त केंद्र प्रमुख पदे भरावीत, अन्यथा शिक्षण व्यवस्थेतील हा गंभीर प्रश्न आणखी तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

थोडक्यात

## 'ऑरेंज सिटी आयकॉन अवॉर्ड्स २०२६' सोहळा उद्या

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महिला सक्षमीकरण, सामाजिक विकास आणि समाजोपयोगी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था तसेच विविध क्षेत्रातील उल्लेखनीय व्यक्तींच्या कायार्चा गौरव करण्यासाठी महिमा बहुउद्देशीय सामाजिक संस्था, नागपूर यांच्या वतीने 'ऑरेंज सिटी आयकॉन अवॉर्ड्स २०२६' या भव्य पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा रविवार, दि. २६ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता अमृत भवन, झाशी राणी चौकाजवळ, रामदासपेठ, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती महिमा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष शितल पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यसभा सदस्या मायाताई इवनाते, नागपूर महानगरपालिकेच्या महापौर निता ठाकरे, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे तसेच, इन्फंट इंडिया संस्थेचे समाजसेवक दत्ताभाऊ बरगजे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. 'नारी शक्ती, समाज की प्रगती, राष्ट्र का उज्वल भविष्य' या संकल्पनेवर आधारित या पुरस्कार सोहळ्यात महिला सक्षमीकरण, सामाजिक विकास आणि समाजहितासाठी कार्य करणाऱ्या संस्था, सामाजिक कार्यकर्ते व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उल्लेखनीय योगदानाचा सन्मान करण्यात येणार आहे. या भव्य सोहळ्यास सामाजिक, शैक्षणिक, स्वयंसेवी क्षेत्रातील मान्यवर, विविध संस्थांचे प्रतिनिधी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजक महिमा बहुउद्देशीय सामाजिक संस्था, नागपूर यांच्या वतीने करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेला शीतल पाटील यांनी संबोधित केले. माया येवले, बबिता धुर्वे, पूनम गौरीकर, प्रताप काशीकर, डॉ. जोहर पटेल, शमी मिझाझ, नंदा कोल्हटकर, प्रीती ठवकर यांची उपस्थिती होती.

## गोधनी रेल्वे परिसरात अजित दादा पवार यांची जयंती साजरी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तर्फे उच्च प्राथमिक शाळा गोधनी रेल्वे येथे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांची जयंती प्रीत्यर्थ अभिवादन करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राजाभाऊ टाकसाळे यांच्या मार्गदर्शनात सर्वप्रथम अजितदादा यांच्या फोटोला हार अर्पण करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी फोटोवर फुल चढविले व अभिवादन केले. या कार्यक्रमा प्रसंगी मान्यवरांनी अजितदादा बद्दल आपले विचार मांडले. याप्रसंगी खोरीपचे यशवंत तेलंग, सामाजिक कार्यकर्ते अढावू सर, राकापा शहर अध्यक्ष गोधनी योगेश ठाकरे, मनीष घोडे सचिव, आजामजी सानेजी, राजू गोतमारे, रत्नाकर वाढके, शिंदे मॅडम व विद्यार्थ्यांना बिस्कीटचे वाटप करण्यात आले. व कार्यक्रमाची सांगता झाली.

## मिनी ट्रकने दुचाकीला कट मारल्याने दुचाकीचा अपघात, पती पत्नीसह दोन चिमुकल्या गंभीर

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा**

शेगाव बु येथुन वरोरा येथे आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी येत असतांना राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३५३ ई वर रानतळोधी



गावाजवळ मागुन येणाऱ्या मीनी ट्रक टेम्पो ने कट मारल्याने दुचाकिचे संतुलन बिघडल्याने पल्सर दुचाकीचा अपघात झाला, यामध्ये दुचाकी चालक कैलास झाडे वय ३० वर्ष, यांच्यासह पत्नी उज्वला कैलास झाडे वय २६ वर्ष, वैष्णवी कैलास झाडे वय ४ वर्ष व पुर्वी कैलास झाडे वय ३ वर्ष राहणार शेगाव बु ता वरोरा जिल्हा चंद्रपूर,हे गंभीर जखमी झाले,जखमिंना वरोरा येथील उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार करुन डॉक्टरांनी पुढील उपचारार्थ जिल्हा सामान्य रुग्णालय चंद्रपूर येथे पाठविण्यात आले आहे. घटनास्थळावरू मिनी ट्रक टेम्पो चा चालक गाडी घेऊन पसार झाल्याचे दुचाकी चालक कैलास झाडे यांनी सांगितले. टेम्पो गाडीचा नंबर माहीत नसल्याने पोलीसांना तपासात अडचण निर्माण होईल, पुढील तपास वरोरा पोलीस करीत आहे.

## २८ जुलैपर्यंत असणार त्रुटी पुर्तता शिबिर विशेष मोहीमेचा लाभ घेण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यापूर्वी जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. जिल्हा जात पडताळणी समितीच्या कार्यालयात ज्या अर्जदारांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे. परंतु सदर अर्जामध्ये त्रुटी असून त्या त्रुटी संबंधाचा ई-मेल तसेच भ्रमणध्वनीव्दारे अर्जदारांना यापूर्वी कळविण्यात आले आहे. परंतु बरेच अर्जदार त्रुटी पुर्ततेकरीता कार्यालयामध्ये हजर झालेले नाही. सध्या कार्यालयामध्ये माहे में २०२६ चे ६० अर्ज, माहे जून चे १८० अर्ज व दिनांक १३ जुलै २०२६ पर्यंत झालेल्या तपासणीमधील १ हजार १६३ अर्ज कार्यालय स्तरावर प्रलंबित आहेत. संबंधित अर्जदारांना त्रुटी संदर्भात ईमेल पाठविण्यात आलेला असून पाठविलेला ईमेल दिसून न आल्यास spam,help desk, all emails या ठिकाणी ईमेल सर्च करावा. जिल्ह्यातील विद्यार्थी व पालकांनी २८ जुलैपर्यंत त्रुटी पुर्तता शिबीर सुरु असून कार्यालयात त्रुटी पुर्तता कागदपत्रासह वेळेत हजर राहून त्रुटी पुर्तता करुन विशेष मोहीमेचा लाभ घ्यावा.

# बहुजन विद्यार्थ्यांच्या हितासाठी 'महाज्योती'ला एक हजार कोटींचा निधी द्या : आ. सुरेश भोळे

### इतर मागासवर्गीय कल्याण समितीच्या बैठकीत आमदार सुरेश भोळे यांचे निर्देश, कौशल्य विकासासह कृषी प्रशिक्षणाला प्राधान्य देण्याची सूचना

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

इतर मागासवर्गीय समाजातील लाखो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, स्पर्धा परीक्षा आणि कौशल्य विकासाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, नागपूर (महाज्योती) आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम होणे आवश्यक आहे. सध्याचा ३०० कोटी रुपयांचा निधी अपुरा असून तो वाढवून १ हजार कोटी रुपये करण्यात यावा, अशी ठाम भूमिका इतर मागासवर्गीय कल्याण समितीचे अध्यक्ष तथा आमदार सुरेश भोळे यांनी मांडली. त्याचबरोबर महाज्योतीच्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडचणी तातडीने दूर करण्याचे स्पष्ट निर्देशही त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.



विधानभवन येथे नुकत्याच पार पडलेल्या इतर मागासवर्गीय कल्याण समितीच्या बैठकीत महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, नागपूर (महाज्योती) तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीत आमदार चरणसिंग ठाकूर, आमदार महेश सावंत, आमदार विक्रांत पाटील, आमदार पंकज भुजबळ, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव ए. बी. धुळाज, महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहसचिव सुनील तुंबारे, 'महाज्योती'चे मुख्य वित्त व लेखाधिकारी प्रशांत वावगे, अपर सचिव प्रिया देशपांडे, कक्ष अधिकारी पुष्पा रावण, लिपिक राहुल जेवूघाले यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत पीएचडी फेलोशिप, यूपीएससी व एमपीएससी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, विद्यार्थ्यांचे विद्यावेतन, निवासी वसतिगृह सुविधा आणि विविध कौशल्य विकास योजनांच्या अंमलबजावणीचा सखोल आढावा घेण्यात आला. अनेक विद्यार्थ्यांना योजनांचा लाभ मिळताना येणाऱ्या प्रशासकीय, तांत्रिक आणि प्रक्रियात्मक अडचणी तातडीने दूर करून कोणत्याही पात्र विद्यार्थ्याला योजनांपासून वंचित ठेवू नये, असे निर्देश आमदार भोळे यांनी दिले.

महाज्योतीच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांसोबतच रोजगाराभिमुख प्रशिक्षणालाही अधिक चालना देण्याची गरज व्यक्त करत त्यांनी आधुनिक शेती, कृषी उद्योजकता, प्रक्रिया उद्योग, मूल्यवर्धन आणि कृषीपूरक व्यवसायांवरील प्रशिक्षण कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबवावेत, असे सांगितले. ग्रामीण भागातील युवकांना स्वावलंबी बनविण्यासाठी कृषी कौशल्य विकास हा महत्त्वाचा घटक ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

बहुजन समाजातील विद्यार्थ्यांची वाढती संख्या, स्पर्धा परीक्षांची वाढती स्पर्धा आणि उच्च शिक्षणासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य लक्षात घेता 'महाज्योती'चा विद्यमान ३०० कोटी रुपयांचा निधी अत्यंत अपुरा असल्याचे आमदार भोळे यांनी बैठकीत स्पष्टपणे मांडले. राज्यभरातील विद्यार्थ्यांपर्यंत अधिक प्रभावीपणे योजना पोहोचविण्यासाठी, नव्या योजना सुरू करण्यासाठी आणि विद्यमान योजनांचा विस्तार करण्यासाठी 'महाज्योती'चा वार्षिक निधी १ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव शासनाने तातडीने मंजूर करावा, अशी त्यांनी जोरदार मागणी केली.

बैठकीत 'महाज्योती'च्या योजनांची परिणामकारक अंमलबजावणी, निधीचा प्रभावी वापर आणि विद्यार्थीकेंद्रित धोरणांना अधिक बळ देण्यावर विशेष भर देण्यात आला. समाजातील गुणवंत, होतकरू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी 'महाज्योती' ही आशेचा किरण ठरत असून, संस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा आमदार सुरेश भोळे यांनी व्यक्त केली.

## 'जनसेवा सप्ताह' अंतर्गत सालेकसा येथे मॅरेथॉन स्पर्धा

### उत्साहात, पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षणार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजू फुंडे**

महाराष्ट्र राज्याचे लोकनेते, लोकप्रिय उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने आयोजित "जनसेवा सप्ताह" अंतर्गत तिसऱ्या दिवशी, शुक्रवार (दि. २४ जुलै २०२६) रोजी सकाळी ८ वाजता वन विभाग कार्यालय चौक, सालेकसा येथे भव्य मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुलभाई पटेल व खासदार राजेंद्र जैन यांच्या मार्गदर्शनाखाली, राज्य सरचिटणीस प्रभाकर दोनोडे, तालुकाध्यक्ष डॉ. अजय उमाटे आणि जिल्हा महासचिव डॉ. हिरालाल साठवने यांच्या नेतृत्वाखाली पार पडला.

या स्पर्धेत सालेकसा तालुक्यातील विविध गावांतील पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण घेणाऱ्या युवक-युवतींनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे :

**मुलींचा गट :** प्रथम - कु. पल्लवी मेघराज शहारे, द्वितीय - कु. रूपा पवनलाल वाघमारे, तृतीय - कु. टिकेश्वरी शैलेन्द्र कुसराम

**मुलांचा गट :**

प्रथम - विकास खेमराज कुराहे, द्वितीय - सागर गजानन पाथोडे, तृतीय - राहुल रोशनलाल पटले

विजेत्यांना रोख पारितोषिक, प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. तसेच सर्व सहभागी स्पर्धकांनाही प्रमाणपत्र व भेटवस्तू देण्यात आल्या.

कार्यक्रमाला तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष विजय मानकर, सालेकसा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महेंद्र गवई, शिवसेना (शिंदे गट) तालुकाप्रमुख विजयभाऊ नागपुरे, माजी जिल्हा परिषद सदस्य बिसराम चर्जे, राजू डोंगरे, अशोक गिरी गोस्वामी, मोक्षधाम सेवा समितीचे कोषाध्यक्ष सुनील असाटी, सालेकसा हायस्कूलचे प्राध्यापक ए. के. शरणागत, बी. एम. कोरे, तालुका क्रीडा संयोजक राकेश रोकडे, सामाजिक कार्यकर्ते लखनलाल अग्रवाल, क्रीडा शिक्षक गोल्डी भाटिया यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात चोख बंदोबस्तासाठी पोलीस कर्मचारी गणेश सोंजाल, सुजीत बंसोड, उदेलाल डोहरे, रविंद्रसिंह परिहार, महिला पोलीस शिपाई माधुरी पाथोडे, कल्पना रहांगडाले तसेच प्रशिक्षक पोलीस शिपाई सोनम बडोले यांनी विशेष सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शहराध्यक्ष ब्रजभूषण बैस, तालुका युवक अध्यक्ष बाजीराव तरोने, तालुका युवती अध्यक्ष सुषमा राऊत, तालुका उपाध्यक्ष ध्रुवकुमार हुकरे, डॉ. जियालाल बघेले, ओमप्रकाश जगणीत, सीमा बैस, राहुल जंगेरे, पल्लवी बैस, ऋषी बैस, हर्ष मेश्राम यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## २२ वर्षांच्या पाठपुराव्यानंतर उभारलेल्या गडचिरोलीच्या कारगिल स्मारकात शहीदांना मानवंदना

### २७ वा कारगिल विजय दिवस उत्साहात साजरा होणार



**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

कारगिल युद्धात मातृभूमीच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शहीद वीर जवानांच्या शौर्य, पराक्रम आणि त्यागाला अभिवादन करण्यासाठी २७ वा कारगिल विजय दिवस रविवार, दि. २६ जुलै २०२६ रोजी गडचिरोली येथे विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन कारगिल चौक दुर्गा उत्सव मंडळ, गडचिरोली, कारगिल स्मारक समिती तसेच शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना, महाराष्ट्र राज्य, जिल्हा शाखा गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

गडचिरोलीतील कारगिल स्मारक हे जिल्ह्याच्या देशभक्तीचे प्रतीक मानले जाते. या स्मारकाच्या उभारणीसाठी कारगिल स्मारक समितीचे संस्थापक उदय धकाते यांनी सन २००० पासून तब्बल २२ वर्षे शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा, पायपीट आणि अथक प्रयत्न केले. त्यांच्या या दीर्घ संघर्षानंतर गडचिरोली शहरात शहीद वीर जवानांच्या स्मृती जपणारे हे स्मारक २०२२ ला साकार झाले. आज या कारगील चौक येथे दरवर्षी कारगिल विजय दिनानिमित्त शहीदांना मानवंदना मागील २६ वर्षा पासून अर्पण केली जाते.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८.०० वाजता इंदिरा (गांधी) चौकातून माजी सैनिकांच्या नेतृत्वाखाली निघणाऱ्या कारगिल विजय रॅलीने होईल. ही रॅली कारगिल चौकातील शहीद स्मारकापर्यंत जाईल. त्यानंतर शहीद जवानांच्या स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करण्यात येईल. यावेळी वीरमाता, वीरपिता, वीरपत्नी, गुणवंत पाल्य तसेच विविध पुरस्कारप्राप्त माजी सैनिकांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे.

कार्यक्रमास पोलीस अधीक्षक एम. रमेश (भा.पो.से.) प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून आमदार डॉ. मिलिंद नरोटे, माजी खासदार डॉ. अशोक नेते,हिम्मतसिंह बेडला (निवासी संचालक, लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लि.), ले. कर्नल रामनाथ स्वामी, कृष्णा रेड्डी, रतिकांता साहू, नगराध्यक्ष प्रणोती सागर निंबोरकर,होमराज डोनाळकर तसेच कारगिल स्मारक समितीचे संस्थापक उदय धकाते यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या कार्यक्रमास शहरातील सर्व सामाजिक, धार्मिक, राजकीय संघटनांचे पदाधिकारी, माजी सैनिक, युवक, महिला, विद्यार्थी तसेच देशभक्त नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शहीद वीर जवानांना आदरांजली अर्पण करावी, असे आवाहन कारगिल स्मारक समितीचे प्रकाश भांडेकर, कालू गोवर्धन, नंदू कुमरे, तसेच शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना, महाराष्ट्र राज्य, जिल्हा शाखा गडचिरोली आणि समस्त आजी-माजी सैनिकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ५७९ उमेदवारांना दिले जाणार नियुक्ती पत्र

### महापौर निता ठाकरे यांची पत्रपरिषदेत माहिती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेतर्फे शहरातील ४७६ सफाई कामगारांना राज्य सरकारच्या मदतीने कायम नियुक्तीच्या पत्रांचे वाटप केले जाणार आहे. याशिवाय सरळ सेवा भरतीतील १०३ असे एकूण ५७९ उमेदवारांना नियुक्ती पत्र दिले जाणार आहे. याशिवाय मनपाच्या परिवहन विभागाने प्रवाश्यांच्या सुविधेसाठी विकसित केलेल्या व्हॉट्स ॲप टिकिटिंग प्रणालीचा शुभारंभ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मनपाच्या हिरवळीवर रविवार ता.२६ जुलै रोजी दुपारी ४.३० वाजता होणार असल्याची माहिती मा. महापौर निता ठाकरे यांनी आज पत्रपरिषदेत दिली.

यावेळी पत्रपरिषदेत उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवाणी दाणी-वखरे, परिवहन समिती सभापती मंगला खेकरे, उपायुक्त निर्भय जैन, राजेश भगत, गणेश राठोड उपस्थित होते.

यावेळी महापौर निता ठाकरे म्हणाल्या की, शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सफाई कामगारांची मोठी भूमिका असते. ते रात्रंदिवस शहर स्वच्छ करण्यासाठी सतत तयार असतात. त्यांच्या नोकरीमध्ये स्थायित्व यावे, या उद्देशाने लाड-पागे समितीने दिलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचा निर्णय मनपाने घेतला आहे. यासाठी राज्य सरकारने मंजुरी दिल्यामुळे सफाई कामगारांसाठी हा विशेष दिवस राहणार आहे. अनेक दिवसांपासून रेंगाळलेल्या या मागणीची पूर्तता होताना आनंद होत आहे. रविवारी होणाऱ्या कार्यक्रमात शहरातील ४७६ सफाई कामगारांना कायम नियुक्तीचे पत्रांचे वितरण केले जाणार आहे. यात २०२ महिला तर २७३ पुरुष सफाई कामगारांचा समावेश आहे. यात लाड-पागे समितीच्या



शिफारशीनुसार तसेच अधिसंख्य सफाई कामगारांचा समावेश आहे. याशिवाय मनपाच्या सरळ सेवा भरतीतील १०३ उमेदवारांना नियुक्ती पत्र दिले जाणार आहे. शहरातील सहाही विधानसभा क्षेत्रात सफाई कामगारांसाठी घरे तयार करण्याचा मानस महापौर यांनी व्यक्त केला.

यावेळी परिवहन समिती सभापती मंगला खेकरे यांनी मनपाच्या परिवहन विभागाने आपली बस सेवा अधिक लोकाभिमुख करण्यासाठी व्हॉटसअप टिकिटिंग सेवाचे लोकार्पण यावेळी माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते शुभारंभ होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. बस बद्दल सर्व माहिती या व्हॉटसअपच्या माध्यमातून नागरिकांना माहिती मिळेल आणि सर्वांना माध्यमातून आपली बसचे तिकीट ऑनलाईन पद्धतीने घेता येणार आहे. बसमध्ये क्यू आर कोड राहील. हा क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर व्हॉटसअप आपोआप सुरू होईल.

यानंतर बाय तिकीटचा पर्याय समोर येईल. यानंतर प्रवाशाला सुरूवातीचे स्थान तसेच गंतव्य स्थान म्हणजे डेस्टीनेशन पर्याय निवडावा लागेल. यानंतर ऑनलाईन पेमेंटचा पर्याय पूर्ण करावा लागेल. ऑनलाईन पेमेंट झाल्यानंतर प्रवाशाच्या मोबाईलमध्ये डीजीटल तिकीट प्राप्त होईल. पर्यावरण पूरक ही पद्धत असल्याने कागदाचा खर्च सुद्धा वाचणार आहे. एक प्रकारे पर्यावरणासाठी पूरक अशी ही प्रक्रिया असल्याची अशी माहिती त्यांनी दिली.

यावेळी महापौर निता ठाकरे यांनी पत्रकारांना माहिती देताना सांगितले. शहरात ५ लाख झाडांचे वृक्षारोपण केले जाणार आहे. यात १ लाख झाडे रायसोनी ग्रुपच्या माध्यमातून उपलब्ध करून दिले जाणार आहे. बदलते पर्यावरण व शहराचे हरीत आच्छादन वाढविण्यासाठी हा उपक्रम मनपाने हाती घेतला आहे. यासाठी विविध संस्थांनी पुढाकार घेतला आहे.

राज्य सरकारने सुद्धा यासाठी रोपटे देण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये गोरेवाडा, नंदग्राम, मनपाच्या सर्व शाळा, भांडेवाडी डंपिंग यार्ड, खाजगी महाविद्यालय व इतर ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येणार आहे. वृक्षारोपणाकरिता गड्डे करण्याकरिता मशीनची मदत घेतली जाईल. ही मशीन मॉईलच्या सीएसआर निधीतून मिळणार असल्याची माहिती महापौर निता ठाकरे यांनी दिली. याशिवाय नागपूर शहरात लावण्यात येणाऱ्या प्रत्येक झाडांची Lat. Long. नुसार Geo-Tagging करण्यात येणार आहे. याकरीता एजेन्सी नेमण्यात येईल. याकरीता यापूर्वी शहरातील सर्व शासकीय विभाग, शाळा, महाविद्यालयाचे प्रतिनिधी, संस्था, गणेश मंडळ, दुर्गा मंडळ व धार्मिक संस्थाचे प्रतिनिधी यांची सभा कविवर्य सुरेश भट सभागृह येथे घेण्यात आली होती.

यामध्ये विविध संस्थांनी मनपास वृक्ष, ट्री-गार्ड मोफत उपलब्ध करून देण्याची सहमती दिली, असुन ह्याबाबत झाड/वृक्षाची रोप उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही सुरु असून, दिनांक १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट या कालावधीत सदर वृक्षारोपण अभियान राबविण्यात येणार आहे. नागपूर शहराला हिरवे करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या क्षमतेनुसार किमान एक झाड लावण्याचे कार्य करावे. असे आवाहन यावेळी महापौर निता ठाकरे यांनी केले.

आषाढी एकादशी

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, २५ जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २२६ | किंमत : २ रूपये











# श्री विठ्ठल माहात्म्य: पंढरीच्या परब्रह्माची महिमा आणि अध्यात्मशास्त्र

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल, वर्धा

पंढरीचा श्री विठ्ठल म्हणजे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे, तर अवघ्या विश्वाचे आराध्य दैवत. पंढरीच्या या सावळ्या परब्रह्माला भक्तांनी आपापल्या प्रेमापोटी पंढरीनाथ, पांडुरंग, पंढरीराया, विठाई, विठोबा, विठुमाऊली आणि विठ्ठल गुरूराव अशा अनेक लाडक्या नावांनी पुकारले आहे. आज जगभरात 'श्रीविठ्ठल' आणि 'पांडुरंग' ही दोन नावे सर्वाधिक प्रचलित आहेत. विठूमाऊलीच्या चरणी लीन होण्यासाठी दरवर्षी लाखो वैष्णव पंढरीची वाट धरतात. बरेच लोक विठ्ठल हा शब्द विष्णु या शब्दाचा अपभ्रंश आहे असे म्हणतात. कानडी शिलालेखातही जे विठ्ठरस, विट्ट असे शब्द आले आहेत ते विष्णु शब्दाची व्याप्ती सांगणारेच आहेत असे मानले जाते.

**विठ्ठल शब्दाची उत्पत्ती आणि अर्थ-**

विठ्ठल

व्युत्पत्ती आणि अर्थ

व्युत्पत्ती : डॉ. रा.गो. भांडारकर म्हणतात की, विष्णु या संस्कृत शब्दाचे कानडी अपभ्रंश रूप बिट्टि असे होते आणि या अपभ्रंशापासून विठ्ठल हा शब्द बनला.

आ. अर्थ

विट'ठल' (स्थळ) विठ्ठल

अर्थ : विटेवर उभा रहातो तो विठ्ठल.

विदा ज्ञानेन ठान् अज्ञजनान् लाति गृहाति ।

अर्थ : अज्ञ जनांना जो ज्ञानाने स्वीकारतो तो विठ्ठल.

विठ्ठल शब्दाच्या उत्पत्तीबाबत इतिहासकार, संशोधक आणि संतांनी विविध मते मांडली आहेत:

विष्णु शब्दाचा अपभ्रंश: डॉ. रा.गो. भांडारकर यांच्या मते, विष्णु या संस्कृत शब्दाचे कानडी अपभ्रंश रूप बिट्टि असे होते आणि यापासूनच पुढे विठ्ठल हा शब्द तयार झाला. कानडी शिलालेखांमधील 'विठ्ठरस' किंवा 'विट्ट' हे शब्द विष्णूचीच व्याप्ती दर्शवतात.

**संत तुकोबारायांची सहज व्याख्या:** जगद्गुरू संत तुकाराम महाराजांनी विठोबा शब्दाची अतिशय सोपी फोड केली आहे. त्यांच्या मते, 'वि' म्हणजे ज्ञान आणि 'ठोबा' म्हणजे आकार; अर्थात ज्ञानाचा मूर्तिमंत आकार म्हणजे विठोबा. दुसऱ्या एका अर्थानुसार, 'वि' म्हणजे गरुड आणि 'ठोबा' म्हणजे आसन, म्हणजेच गरुड ज्याचे आसन आहे असा तो श्रीविष्णु!

पुराणोक्त अर्थ- पुराणातील एका श्लोकानुसार विठ्ठल या अक्षरांमध्ये त्रिदेवांचे अस्तित्व सामावलेले आहे:

वि कारो विधाताय (ब्रह्मदेव),
ठ कारो नीलकण्ठ (शंकर)
ल कारो लक्ष्मीकांत (विष्णु),
विठ्ठलाभिधिनीयमे

अर्थात, ब्रह्मा, विष्णू आणि महेश या तिन्हींचे एकत्रित रूप म्हणजेच 'विठ्ठल' होय.

बुधवार आणि विठ्ठलाचा संबंध

श्रीकृष्ण, श्रीविष्णु आणि श्रीविठ्ठल हे एकच मानले जातात. श्रीकृष्णाचा अवतार द्वापर युगाच्या शेवटी बुधवारी (श्रावण वद्य अष्टमी) झाला. विठोबा हे श्रीकृष्णाचेच रूप असल्याने बुधवार हा विठ्ठलाचा विशेष वार मानला जातो.

**श्रीविठ्ठल मूर्तीवर्णन**

पंढरपूर येथील विठुरायाची मूर्ती स्वयंभू असून ती वालुकामय शिलेची आहे. आद्य शंकराचार्यांनी आपल्या प्रसिद्ध 'पांडुरंगाष्टक' स्तोत्रात मूतीर्चे अत्यंत मार्मिक वर्णन केले आहे.

**मूर्तीचे मुख व मस्तक:** श्रींच्या मस्तकावर शिवलिंगाच्या आकाराची उंच, कंगोरेदार टोपी (मुकुट) आहे. मुख उभट, गाल फुगीर आणि दृष्टी समचरण (सरळ) आहे. कानांमध्ये मकर कुंडले आणि गळ्यात कौस्तुभमणी आहे.

**हस्तमुद्रा (कटेवर हात):** भगवंताने आपले दोन्ही हात कटेवर (कमरेवर) ठेवून भक्ताची वाट पाहत उभे राहण्याची मुद्रा धारण केली आहे. उजव्या हातात कमळाचा देठ असून अंगठा खाली येईल असा तो टेकवला आहे, तर डाव्या हातात शंख आहे.

पाठीवर शिंके असून हृदयात श्रीवत्सलांछन आहे. छातीवर उजवीकडे भृगुऋषींच्या पादस्पशार्ची खूण आहे. नाभीतून ब्रह्मदेव निघाले आहेत. कमरेला तिहेरी मेखला आणि वस्त्र असून, वस्त्राचा सोगा पावलांपर्यंत येतो. डाव्या पायावर 'मृतकेषी' नावाच्या दासीने बोट लावल्याची पौराणिक खूण आजही दिसते.

**दर्शन माहात्म्य:** संपूर्ण भारतात केवळ पंढरपूर येथेच भक्तांना भगवंताचे थेट चरणस्पर्श दर्शन घेण्याचे किंवा चरणावर मस्तक ठेवण्याचे परम भाग्य लाभते.

**पौराणिक कथा आणि पुंडलिकाची मातृ-पितृ भक्ती मुचकुंद राजाचा वर आणि कालयौवनाचा वध**

द्वापर युगात मुचकुंद नावाच्या पराक्रमी राजाने देवासुरांच्या युद्धात देवांना विजय मिळवून दिला. थकून गेलेल्या राजाने देवांकडे गाढ निद्रेचा आणि "जो माझी निद्रा मोडील तो माज्या दृष्टीक्षेपाने भस्म होईल" असा वर मागितला. पुढे कृष्ण अवतारात, शस्त्र-अस्त्राने न मरणारा राक्षस 'कालयौवन' कृष्णाच्या मागे लागला तेव्हा कृष्णाने युक्तीने त्याला मुचकुंद राजा झोपलेल्या गुहेत नेले. राजावर आपला शेला टाकून कृष्ण लपले. कालयौवनाने कृष्णा समजून राजाला लाथ मारली. राजाची झोप उडताच त्याच्या क्रोधीत नजरेने कालयौवन जळून भस्म झाला. त्यानंतर श्रीकृष्णाने राजाला दर्शन दिले व पुढील जन्मात त्याची इच्छा पूर्ण करण्याचे वचन दिले. हाच मुचकुंद राजा कलियुगात भक्त पुंडलिक म्हणून जन्मास आला.

श्री विठ्ठलाच्या दर्शनाचा आरंभ होतो, तो वीटेपासून म्हणजे देवाच्या सगुण रूपापासून आणि शेवट होतो, तो महादेवाच्या पिंडीच्या आकाराच्या दर्शनात. साधनेत सोहम्, सोहम् सांगितले जाते किंवा हंसोहम् असे म्हटले जाते. सोहम्, सोहम् म्हणतांना आपला श्वास स्थिरावतो आणि हंस होतो. त्यानंतर तो चिदाकाशात जातो. या चिदाकाशातील जी अहंविरहीत पूर्ण शुद्ध जाणीव आहे, ती म्हणजे सोहम् किंवा अहं ब्रह्मास्मि । म्हणजे मी ब्रह्म आहे, ही जाणीव.

**रुक्मिणीचा रूसवा आणि पुंडलिकाची सेवा:**

श्रीकृष्णाने राधिकादेवीला जवळ बसवल्याचे पाहून रुक्मिणीदेवी सवतीमत्सरापोटी रागाने पंढरी जवळील दिंडीर वनात तपश्चर्या करत बसल्या. त्यांचा शोध घेत कृष्ण पंढरपूरला आले. रुक्मिणीच्या शोधाचे निमित्त साधून, पूर्वजन्मीच्या वचनानुसार ते दिंडीर वनात चंद्रभागेतिरी राहणाऱ्या पुंडलिकाला भेटायला आले.

पुंडलिक हा आधी माता-पित्याचा द्रोह करायचा, पण कुक्कुटमुनींच्या आश्रमात गंगा, यमुना, सरस्वती या नद्यांना मुनींच्या मातृ-पितृ भक्तीमुळे शुद्ध होताना पाहून त्याचे डोळे उघडले. त्याने माता-पित्याची निस्सीम सेवा सुरू केली. जेव्हा भगवंत पुंडलिकाला भेटायला आले, तेव्हा पुंडलिक माता-पित्याच्या सेवेत मग्न होता. त्याने देवाचा आदर केला, पण सेवा अर्धवट सोडून तो उठला नाही. देवांना उभे राहण्यासाठी त्याने जवळच पडलेली एक वीट सरकवली (ती वीट म्हणजे शापित इंद्र होता). माता-पित्याची सेवा पूर्ण होईपर्यंत देवाने विटेवर उभे राहून प्रतीक्षा करावी, अशी विनंती पुंडलिकाने केली. भक्ताच्या प्रेमापोटी परब्रह्म विटेवर उभे राहिले ते



आजतागायत! संत नामदेवराय म्हणतात,

`पुंडलिकाभेटी परब्रह्म आले गा विठ्ठल...

तीर्थक्षेत्र एकतर योगपीठ असते किंवा शक्तीपीठ असते; परंतु आद्यशंकराचार्यांनी पंढरपूरला महायोगपीठ म्हटले आहे. तीर्थक्षेत्री भक्त देवाच्या किंवा शक्तीपिठावर देवीच्या दर्शनासाठी जात असतात; मात्र पंढरपूरला पांडुरंग भक्त पुंडलिकाची वाट पहात तिष्ठत उभा आहे. परमेश्वर भक्ताची वाट पहात आहे; म्हणून हे महायोगपीठ आहे. पंढरपूर येथील श्री विठ्ठलाच्या मूर्तीमध्ये सगुण आणि निर्गुण रूपांचा उत्कृष्ट संयोग आहे. श्री. मुकुंद भगवान पुजारी, पंढरपूर, जिल्हा सोलापूर.

**'पांडुरंग' नावाचा इतिहास आणि गूढार्थ**

विठ्ठलाची मूर्ती काळ्या रंगाची असूनही त्याला 'पांडुरंग' (पांढऱ्या रंगाचा) का म्हणतात? यामागे काही कारणे आहेत, दह्या-दुधाचा अभिषेक: विठ्ठल हा शिवाचा व कृष्णाचा अवतार मानला जातो. शास्त्र आणि पुराणांनुसार विठ्ठलाचा रंग सावळा असला, तरी भक्तांनी सतत केलेल्या दही-दुधाच्या अभिषेकामुळे तो पांढरा धवल भासतो.

**सूक्ष्म-दर्शन:** मूर्ती बाह्यतः काळी दिसत असली, तरी खऱ्या भक्ताला आध्यात्मिक सूक्ष्म-दृष्टीने ती पांढरीच सात्त्विक तेजाने युक्त दिसते. प्रत्येक मासातील (महिन्यातील) दोन एकादश्यांपैकी पहिली श्री विठ्ठलाच्या नावे आणि दुसरी पांडुरंगाच्या नावे करतात.

**पंढरपूरची निर्मिती:** पांडुरंग हे धवल शिवाचे नाव आहे. याचेच कानडीत पंडरंगे हे रूप होते; म्हणून पांडुरंग अथवा पंडरंग याचे पूर ते पंढरपूर होय, असे डॉ. रा.गो. भांडारकर म्हणतात. विठ्ठल याचे दुसरे नाव पांडुरंग होय.

**२८ युगे उभे असण्याचे रहस्य:**

विठ्ठल 'युगे अठ्ठावीस' उभा आहे, याचा अर्थ; कालचक्र: सत्य, त्रेता, द्वापर आणि कलि या चार युगांचा एक फेरा होतो. सध्या पृथ्वीचा ७ वा फेरा सुरू आहे. म्हणजेच २८ वे युग चालू आहे.

**ज्ञानरूप बेरीज:** ४ वेद, १८ पुराणे आणि ६ शास्त्रे यांची एकूण बेरीज २८ होते. हे सर्व ग्रंथ पांडुरंगाचेच गुणगान करतात. अध्यात्मशास्त्रानुसार, २८ युगांपासून उभे राहणे म्हणजे भगवंत निर्गुण आणि तत्त्व रूपाने अनादिकालापासून येथे कार्यरत आहेत.

**विठ्ठल मूर्तीचा वनवास आणि इतिहास:**

ऐतिहासिक काळात पंढरीच्या विठ्ठलाला परकीय आक्रमकांपासून वाचवण्यासाठी अनेकदा वनवास भोगावा लागला.

**विजयनगरचा प्रवास:** १६ व्या शतकाच्या मध्यास विजयनगरचा राजा रामराया याने मूर्ती आक्रमकांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी विजयनगर येथे नेऊन भव्य मंदिरात स्थापन केली.

**संत भानुदासांचे कार्य-** संत एकनाथ महाराजांचे पणजोबा संत भानुदास महाराज यांनी आपल्या भक्तीच्या बळावर ती मूर्ती विजयनगरहून पुन्हा पंढरपुरात आणली.

**गुप्त स्थळी स्थलांतर:** १६६९ ते १७१५ या काळात मुसलमानी आक्रमकांपासून रक्षण करण्यासाठी मूर्ती अनेकदा गुप्त स्थळी काडकुसुंबे गाव येथे हलवण्यात आली. १७१५ मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी सैन्याकडून उपद्रव होणार नाही असे अभयपत्र दिल्यानंतर विठ्ठलाची मूर्ती मूळ मंदिरात कायमची प्रस्थापित झाली.

**श्री विठ्ठल उपासनेमागील अध्यात्मशास्त्र:**

कुंकू न लावता बुक्का लावतात: कुंकू हे सक्रिय आदिशक्तीचे प्रतीक आहे, तर बुक्का हा शिवाच्या वैराग्यभावाचे साक्षीभावाचे प्रतीक आहे. विठ्ठल हे सगुणाच्या साहाय्याने निगुर्णाची कास धरून साक्षीभावात रमणारे तत्त्व आहे. विठ्ठलाच्या आज्ञाचक्रावर (भिवयांच्या मध्ये) बुक्का लावल्याने मूतीर्तील सुप्त वैराग्यलहरी जागृत होतात, ज्या भक्ताला मायेतील आसक्ती त्यागून ब्रह्म पाहण्याचे बळ देतात.बुक्का लावल्याने श्री विठ्ठलाच्या मूर्तीत आज्ञाचक्राच्या ठिकाणी सुप्त असणाऱ्या साक्षीभावात्मकरूपी वैराग्यलहरी कार्यरत होऊन त्या जिवासाठी स्वतःतील अनाहतचक्राशी सुप्त असणारी क्रियाशक्ती जागृत करून जिवाला मायेत ब्रह्म पहाण्याचे बळ देऊन त्याला मायेपासून विलग करतात.

**गोपीचंदन आणि तुळस:**

मूर्तीमधील श्रीविष्णुतत्त्व जागृत करण्यासाठी तिला 'गोपीचंदन' लावले जाते, ज्यामुळे भक्तांची आध्यात्मिक उन्नती होते. मूर्तीमधील श्रीकृष्णतत्त्व जागृत करण्यासाठी 'तुळस' वाहिली जाते, ज्यामुळे भक्ताला चैतन्याची अनुभूती येते.

**टाळ-मृदुंगाचा गजर:**

नामाच्या आणि टाळ-मृदुंगाच्या गजरामुळे मूर्तीभोवती असणारी नवग्रहमंडले, नक्षत्रमंडले आणि तारकामंडले जागृत होतात व त्यांच्या लहरी भक्तांचे कल्याण करतात.

**मूर्तीची त्रिगुणात्मक रचना:**

विठ्ठलाची मूर्ती ही पूर्ण परब्रह्माचे प्रतीक आहे. मूतीर्चा कटीच्या खालचा भाग ब्रह्मदेव स्वरूप निर्मिती, कटीपासून मानेपर्यंतचा भाग विष्णुस्वरूप स्थिती आणि मस्तकाचा भाग शिवस्वरूप लय आहे. कटेवर हात असणे म्हणजेच भगवंताने आपल्या ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रियांना पूर्णपणे अधीन नियंत्रणात ठेवले आहे.

एखादी व्यक्ती कितीही नास्तिक असली, तरी पंढरपूरला आल्यावर भक्तीमय होते; म्हणूनच पंढरपूरला भक्तीपीठ म्हणतात. विठ्ठलाचे नाव घेताच भक्ताच्या देहाचे भान हरपून जाते आणि अंतःकरणात ब्रह्मानंद प्रकट होतो. जसे चरणसेवकांनी म्हटले आहे:

विठ्ठलाचे नाम घेता लाभला आनंद,
विठुमाउलीच्या चरणी मन होई दंग...
विठ्ठल दर्शनाने होती, पावन पंचप्राण!

पंढरीचा हा विठ्ठल केवळ एक मूर्ती नसून भक्ती, ज्ञान, वैराग्य आणि मातृ-पितृ प्रेमाचा अथांग सागर आहे, जो आजही भक्तांसाठी विटेवर समचरण उभा आहे.

**जय हरी विठ्ठल,**
**श्री ज्ञानबा तुकाराम**

– ९५६१५९४३०६

# एकचि हे व्रत त्रैलोक्या समर्थ!

शशिकांत म.तोटे
दारव्हा, जि.यवमाळ

एकादशी हिंदू धर्मात पाळली जाणारी एक पवित्र अशी तिथी आहे. ही तिथी प्रत्येक महिन्याच्या शुक्ल आणि कृष्ण पक्ष या दोन्ही पंधरवाड्यात येते. त्यामुळे वर्षात एकूण चोवीस एकादशी येतात, तर हिंदू लीप वर्षात (अधिक मासात) दोन अतिरिक्त एकादशी सुद्धा येतात. प्रत्येक पंधरवाडी एकादशीला विशेष असे महत्त्व आहे. त्याची नावे सुद्धा भिन्नभिन्न आहे.आषाढ मासातील शुक्ल पक्षातील एकादशीला 'देवशयनी आषाढी एकादशी'असे म्हणतात.

प्रत्येक एकादशी तिथी ही भगवान श्रीहरी विष्णूंना समर्पित आहे. या दिवशी भगवान विष्णूची मनोभावे पूजा आणि उपासना केली जाते.एकादशीला उपवास केल्याने मन आणि शारीरिक इंद्रियांवर नियंत्रण मिळते.तसेच आध्यात्मिक प्रगतीच्या दृष्टीने एकादशीच्या व्रताकडे बघितले जाते. पुराणानुसार पूर्वी देव आणि दानव यांच्यात युद्ध पेटले.कुंभ दैत्याचा पुत्र मृदूमान्य यांनी तप करून शंकराला प्रसन्न केले व अमरपद मिळविले.त्यामुळे तो ब्रह्मदेव,शिव,विष्णू या देवावर अजिंक्य झाला. त्याच्या भयाने देव त्रिकूट पर्वतावर आवळी (धात्री) या वृक्षातळी गुहेत दडून बसले.त्यांना आषाढी एकादशीचा उपवास करावा लागला. जोरदार पाऊस झाला, त्या पर्जन्यधारीत त्यांचे स्नान झाले. अकस्मात त्यांच्या श्वासातून एक शक्ती निर्माण झाली. गुहेच्या दारात बसलेल्या मृदुमान्य दानवाला ठार मारले. ही जी शक्तीदेवी तीच 'एकादशी' देवता होय.आषाढ महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशीला 'देवशयनी आषाढी एकादशी'असे म्हणतात.

या दिवशी श्री विठ्ठलाच्या रूपाने भगवान विष्णूची पूजा केली जाते.पुढील चार महिने कार्तिकी एकादशी पर्यंत भगवान श्रीहरी विष्णू क्षीरसागरात(विश्वसागरात) शेषनागावर योगनिद्रेला जातात. म्हणून तिला 'देवशयनी एकादशी'असे नाव देण्यात आले आहे.या दिवसापासून चातुमार्सास प्रारंभ होतो.या दिवशी उपवास,पूजा अर्चा केल्याने भगवान श्रीहरी विष्णू प्रसन्न होतात.एकंदरीत देवशयनी आषाढी एकादशी धार्मिक आणि अध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वाची आहे.

वारकरी संप्रदायात आषाढी एकादशीला विशेष असे महत्त्व असून मोठी एकादशी म्हणून ओळखले जाते. एकादशी व्रत करण्याचे काही नियम आहेत. एकादशी व्रत करण्याच्या आदल्या दिवशी दशमीला एकभुक्त राहावे. एकादशीच्या दिवशी प्रातः स्नान करावे. तुळशी अर्पण करून श्रीविष्णूची मनोभावे पूजा करावी. उपवास व्रताचे पालन करावे, असे या एकादशी व्रताबद्दल सांगितलेले आहे. आपल्या वारकरी वैष्णवांचा श्रीक्षेत्र पंढरपूर येथे भव्यदिव्य असा असा सोहळा असतो.या व्रताचे पालन बहुसंख्येने महाराष्ट्रातील प्रत्येक घरामध्ये मोठ्या श्रद्धेने व भक्ती भावाने केले जाते. शांतीब्रह्म संत एकनाथ महाराजांनी या व्रताबद्दल एक आचारसंहिता अभंगातून साधकांना सांगितलेली आहे. ती पुढील प्रमाणे..

"दशमी व्रताचा आरंभु' दिंडी कीर्तन करा समारंभु '
तेणे हा तो स्वयंभू' संतोष पावे''
एकादशी जागरण 'हरीपूजन नामसंकीर्तन ''
द्वादशी क्षिरापती जाण' वैष्णव जन सेविती ''
ऐसे व्रत तीन दिन' करी जो आदरे प्रेमपूर्ण ''
एका जनार्दनी बंधन ' तया नाही सर्वथा ''

असा एकादशी व्रताचा महिमा अनेक संतांनी गायला आहे.पवित्र पावन एकादशी व्रत देवांनी सुद्धा आचरले आहे. म्हणून आपले वारकरी संत सुद्धा इतर साधकांना सुद्धा एकादशी व्रत आचरणाचा आग्रह करतात. संत तुकाराम एका अभंगातून म्हणतात.

" ज्यासी नावडे एकादशी' जीताची नरकवासी ''
ज्यासी नावडे हे व्रत' त्यासी नरक तोही भीत ''
ज्यासी घडे एकादशी' जाणे लागे विष्णुपाशी''
तुका म्हणे पुण्यराशी' तोचि करी एकादशी ''"



आपल्या अनेक वारकरी संतांनी मानव जन्म लाभल्याबद्दल वारंवार श्री विठ्ठलाचे आभार व्यक्त केले आहे. व ते स्वतःला भाग्यवान समजतात की, जन्मोंजन्मीचे बहु पुण्य आहे,तेव्हा आपल्याला हे व्रत आचरण्याची भाग्य लाभले व पंढरीची वारी घडली. तर श्री विठलाची सेवा घडण्याकरिता पुन्हा.. पुन्हा मानव जन्म मागतात.

"तरीच जन्मा यावे' दास विठोबाचे व्हावे ''"

श्री विठ्ठलाचे सख्य असलेले पंढरपूर निवासी संत नामदेव महाराज श्रीविठ्ठलाशी हितगुज करताना एका अभंगात म्हणतात.

" आषाढी कार्तिकी विसरुं नका मज ' सांगतसे गुज पांडुरंग ''"

साक्षात पांडुरंग परमात्मा नामदेवांशी हितगुज करताना म्हणतात. आषाढी-कार्तिकीच्या दिव्य सोहळ्यात मला विसरू नका.ज्याप्रमाणे, भक्तांना विठुरायाच्या भेटीची ओढ असते. तशीच तळमळ आणि ओढ भगवंताला सुद्धा भक्तांच्या भेटीची असते. हे नामदेवरायांच्या अभंगाच्या प्रमाणानुसार सिद्धच होते.

"जय हरि"

– ९१३०८३५४५८

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)




# आषाढी वारी: भक्ती, शक्ती आणि समतेचा महासंगम

रवींद्र मालुसरे
मुंबई

श्रीक्षेत्र पंढरपूरचा लोकदेव विठोबा हा गरिबांचा देव आहे. द्वारकेचा राणा तिकडचे ऐश्वर्य त्यानें सोडून दिलें आणि "देव भावाचा लंपट । सांडून आलासे वैकुंठ ॥"अशी नोंद पुराणात आहे. वारकरी पंथ हा अडाणी लोकांचा पंथ आहे, असा पुष्कळांचा समज आहे; पण त्यांत तिळमात्र तथ्य नाहीं. भोळीभाबडी भक्ति हाच त्या पंथाचा आधार असल्यामुळे हजारों लोक गेली शेकडो वर्षे दरवर्षी आषाढी - कार्तिकी वारीच्या निमित्ताने त्यांत सामील होत असतात. वारकरी पंथांत विठ्ठलभक्तीचा महिमा विशेष आहे. निवृत्तिनाथ ते निळोबा अशी वारकरी परंपरा आहे.

या पंथानें विद्वत्तेचें अवडंबर माजविलें नाहीं हे खरें; परंतु त्यानें अंधभक्तीलाहि कोठेंच थारा दिलेला नाहीं. वात्सल्य, दयाशीलता, सहिष्णुता, क्षमाशीलता इत्यादि गुणांनीं तो संपन्न आहे. विठाई ही खरी अनाथांची माउली आहे. म्हणूनच तिच्याशी प्रेमानें सलगी करतांना भक्तांना कधीं संकोच किंवा भीति वाटत नाहीं. "ज्ञानदेव तु कैवल्यम्' हे वेदान्ताचें मुख्य सूत्र त्यानें कधींहि सोडलें नाहीं. नामसंकीर्तनासारख्या सहजसुलभ साधनाचा त्यानें उदोउदो केला; पण साधनाच्या दृष्टीनें ही केवळ पहिली पायरी आहे हें त्यानें वारंवार व निक्षून सांगितलें आहे. वारकरी संप्रदाय अद्वैती असल्यामुळे अद्वैत तत्त्वज्ञानाचे निरूपण असलेले सर्व ग्रंथ वारकऱ्यांना शिरोधार्य आहेत. त्यातही गीता आणि भागवत हे दोन्ही ग्रंथ वारकऱ्यांच्या नित्य पठणात असतात. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत इत्यादी श्रेष्ठ ग्रंथ वारकऱ्यांना पवित्र आहेत. 'गीता भागवत करिती श्रवण। अखंड चिंतन विठोबाचे ।।' अशी वारकऱ्याची महत्त्वाची खूण तुकाराम महाराजांनी सांगितली आहे.

त्याशिवाय ज्ञानेश्वरी व ज्ञानेश्वरांचे अन्य सर्व ग्रंथ, नामदेव महाराजांची अभंग गाभा, एकनाथ महाराजांचे एकनाथी भागवत म्हणजेच भागवताच्या एकादश स्कंदावरील टीका, तुकाराम महाराजांची अलौकिक गाथा, नाथांचेच भावार्थ रामायण आणि या सर्वांच्या जोडीला वारकरी संप्रदायाच्या सर्व संतांची अभंग रचना वारकऱ्याला प्रमाण आहे. त्या सर्व संतांची अभंगसंपदा सर्व वारकऱ्यांना अत्यंत प्रिय आहे. आपल्या ग्रंथातून सर्व संतांनी अद्वैत तत्त्वज्ञानच सांगितले आहे. ज्ञानेश्वरी आणि तुकोबांची गाथा ही वारकऱ्यांना सर्वाधिक प्रिय म्हणावी लागतील. त्याखालोखाल नाथांचे भागवत येते. यांच्या तुलनेत नामदेव महाराजांची अभंगसंपदा मात्र काहीशी उपेक्षित राहिली. नामदेवांच्या बाबतीत झालेली उपेक्षा दुसऱ्या भक्तिखंडात विशेष करून प्रस्तावनेत आली आहे. परंतु सर्व संतांचे अभंग वारकऱ्यांना प्रिय असतात

वारकरी पंथ हा सर्वसंग्राहक आहे. त्यानें संकुचित सांप्रदायिकता बाळगली नाहीं, प्रतीकाचा दुराग्रह धरला नाहीं, दैवतावर रणें माजविली नाहींत. परमेश्वर सर्वव्यापी आहे व तो विविध रूपांनी नटलेला आहे; "तुका म्हणे हरि। अवघा एकला ॥ परी हा धाकुला। भक्तीसाठीं ।।" म्हणून उपासकांची भावनाच मुख्य आहे, प्रतिमा गौण आहे, याची जाणीव त्यांना होती. त्यामुळे राम, कृष्ण, दत्त, शिव इत्यादि दैवतांच्या भक्तांना त्यांनी आपल्यांत सामावून घेतले. वारकरी संतांनी तर नेहमींच विष्णु व शिव यांच्या ऐक्यावर भर दिला आहे. "शिव मस्तकी धरिला। भेद मक्तांचा काढिला ॥" लक्षावधी शूद्राशूद्राना या दयामय दैवतानें आत्मोद्धाराची प्रेरणा दिली आहे, बंधुभावाचे पाठ दिले आहेत. मात्र संतांच्या मताप्रमाणे 'विठोबा हा वारकऱ्यांच्या दृष्टीने राम, कृष्ण व विठ्ठल हे तिथेहि एकाच परमेश्वराचे अवतार आहेत.

लोकांत श्रद्धा होतीच, तिला संतांनी डोळसपणा आणला. बहुजनसमाजाच्या आत्मिक उन्नतीसाठीं त्यांनी वारकरी पंथाला नवें वळण लावलें. संत ज्ञानेश्वर हे वास्तववादी धर्मसुधारक होते. महाराष्ट्रातील सर्वच संतांनी अध्यात्मविद्या ही आतां केवळ दशग्रंथी ब्राह्मणांची मिरास राहिली नाहीं. वारकरी पंथानें संतांनीच निर्माण केलेल्या ग्रंथसाहित्यातून लोकांतून धर्मप्रवक्ते तयार केले. "आम्हां 'कीर्तन' कुळ धाडी" अश्या भावनेनें ते आपला जन्मसिद्ध हक्क गाजवू लागले. संत ज्ञानेश्वरांच्या भावार्थ दीपिकेनें या लोकांना कवित्वाची प्रेरणा, तशीच कीर्तनाची स्फूर्ति दिली. "वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा। येरांनी वाहावा भार माथां !" असें आव्हानपूर्वक म्हणण्याइतका आत्मविश्वास संत तुकारामांसारख्या कुणब्याने सर्वदूर महाराष्ट्रात विविध ठिकाणी उत्पन्न झाला.



वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा संप्रदाय असल्यामुळे पंढरीच्या वारीसाठी सर्व महाराष्ट्रातून अनेक दिंड्या व फड वर्षानुवर्षे भुवैकुंठात दाखल होतात. त्यात आळंदीहून निघणारी ज्ञानोबांची दिंडी सर्वात प्रभावी आहे.

आळंदीहून येणारी ही दिंडी हैबतबाबांची असून वारीची सात्त्विक परंपरा दृढमूल करण्याचे श्रेय आधुनिक काळात हैबतबाबांनाच आहे. त्र्यंबकेश्वर (निवृत्तिनाथ), सासवड (सोपानकाका), एदलाबाद (मुक्ताई), पैठण (एकनाथ महाराज), देहू (तुकाराम महाराज) या मोठ्या दिंड्याही वारीसाठी पंढरीत येतात. त्याशिवाय अरणभेंडीहून सांवता महाराज, मंगळवेढ्याहून चोखोबा महाराज, तेरढोकीहून गोरोबाकाका, लऊळहून कुर्मदास महाराज यांच्या दिंड्याही पंढरीत उत्सवासाठी अक्षय परंपरेने येतात. नेवाशाहूनही दिंडी पंढरीत येते. वारकरी संप्रदायाची सात्त्विक परंपरा प्रामुख्याने महाराष्ट्रातील नामवंत फडांनी टिकविली आहे. वारकऱ्याचा आचार पाळणारे आणि पंढरीशाला भजणारे वारकरी महाराष्ट्रात लक्षावधी आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ते पसरले आहेत. अनेक गावात, शहरात हजारो वर्षे हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून लोकांचे प्रबोधन करीत आहेत. लाखोंची वारी किंवा होणारे नामसंकीर्तन हे न चुकता सर्व शिस्तीने घडते आहे. याचे सर्व श्रेय संतांच्या ग्रंथसंपदेला आणि निरूपणाच्या माध्यमातून मशागत करण्याऱ्या लाखोंच्या भक्तांना जाते.

त्यातही या संप्रदायात खोलवर रुजलेली फड परंपरेनी महत्वाची कामगिरी केली आहे. त्या त्या स्थळी असलेल्या वारकरी प्रमुख आणि त्यांच्या शिष्य मंडळींचा एकत्रित, संघटित, शिस्तबद्ध आणि सदाचारी समुदाय म्हणजे फड म्हणता येईल. पंढरीच्या वारीची शिस्त आणि कीर्तनभक्ती व नामस्मरण यांची अक्षुण्ण परंपरा या फडांमुळे अधिकच समृद्ध झाली आहे.

स्वकर्म आचरल्यानंतर दिवसातील काही वेळ मुद्रा, भजन, कीर्तन, पाठांतर, मंत्रजप यासाठी प्रत्येक वारकऱ्याने द्यावयाचा असतो. वारकरी संप्रदाय हा खऱ्या अर्थाने सात्त्विक पंथ आहे. या संप्रदायाचे अनुयायी प्रामुख्याने बहुजन समाजातील असून गरीब कुटुंबातील असतात. परंतु त्यांची नीतिमत्ता, आदर्श, सदाचारी वर्तणूक बहुसंख्य वारकऱ्यांच्या कर्तव्यातून आणि कर्मातून सहजपणे प्रगट होत असते. पंढरी आणि देहू आळंदीच्या वाटेवर असताना वारकऱ्यांची ही सदाचारता निःसंशय प्रत्ययाला येते.

- अध्यक्ष,मराठी वृत्तपत्र
लेखक संघ, मुंबई
९३२३११७७०४

# वडाळा गावचे तीर्थक्षेत्र "श्री प्रतिपंढरपूर"

दिनेश जयराम हुमणे,
डोंबिवली

आषाढी एकादशी म्हणजे पंढरीचा मानाचा दिवस. आपल्या या विठुरायाचे दर्शन घेण्याच्या लगबगीने सारे वारकरी वारी करीत पंढरीची पायी वाटचाल करीत असतात. टाळ मृदुंग, ग्यानबा तुकाराम, जय हरी विठ्ठल, जय जय विठ्ठल या जयघोषात या विठुरायाचे नामस्मरण करीत वारकरी विठ्ठलाच्या नामस्मरणात लीन होताना दिसतात.

प्रत्येक विठ्ठलभक्ताला आपल्या देवाचे दर्शन व्हावे असे वाटत असते. परंतु प्रत्येकालाच वारीला जाण्याची संधी मिळेलच असे नाही. असंच मुंबईकरांच्या बाबतीत काही दिसून येते. मुंबई मधील भक्तांना या विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला जाणे शक्य होत नाही. अशावेळी हे भक्त मुंबईतील वसलेल्या वडाळा गावांत " श्री. प्रतिपंढरपूर " या मंदिरात वारी काढतात. मुंबईतील पंढरीत टाळ मृदुंगाचा नाद, वैष्णवांचा मेळा, भगवा पताका, विद्युत रोषणाई हे सारे दृश्य पाहायला मिळते. अशाच मुंबईतील प्रसिद्ध प्रतिपंढरपूर " म्हणजेच वडाळा गांवातील विठ्ठल रुक्मिणी मंदिर. मंदिराचा विस्तार वाढवण्यात आला असून मंदिराचा कळस हा भागवतभक्त सोनोपंत दांडेकर यांनी बसवला होता असे सांगितले जाते.

मुंबईतील ज्यांना पंढरपूर येथे जाणे शक्य होत नाही, त्यांच्यासाठी हे मंदिर एक प्रतिपंढरपूर म्हणून उभे आहे. मंदिरात आषाढी एकादशीला लाखो भाविकांची गर्दी दिसून येते. मुंबईतील कुलाबा आणि अनेक ठिकाणाहून येथे वारक-यांच्या दिंड्या येतात. जत्रेचा उत्साह ही असतो. असे हे मंदिर पूर्वाभिमुख असून संपूर्ण संगमरवरी आहे. मंदिरात प्रथम प्रवेश करताना आपल्या नजरेस पडते ती काळ्या पाषाणातील गरुड देवाची मूर्ती, बाजूला शनी देवाचे मंदिर, आत गेल्यावर श्री. मारुतीरायाची मूर्ती, पुढे गेल्यानंतर मुख्य गाभा-यात दर्शन घडते सुंदर काळ्या पाषाणातील विविध आभूषणे आणि अलंकाराने नटलेली विठ्ठल-रखुमाईची मूर्ती.




या मंदिरच्या उजव्या बाजूला महादेवाचे मंदिर असून डाव्या बाजूला श्रीदत्त, देवीचे गणपतीचे मंदिर आहे, मंदिरात पहाटे काकड आरती, दुपारी १ आणि सायंकाळी ७ वाजता आरती तर रात्री ९.३० वाजता शेजारती होत असून दररोज सायंकाळी ५ ते ७ वाजता आणि रविवारी ४ ते ७ हरिपाठ प्रवचन असा हा मंदिराचा कार्यक्रम असतो. दशमीपासून भजन सुरु होऊन ते आषाढी एकादशीच्या रात्री पर्यंत भजन सुरु असते. आषाढीला लाखो वैष्णवांचा मेळा भरतो. संपूर्ण मंदिर हरिनामाच्या जपाने दुमदुमून जातो. मंदिरातील विठ्ठल रखुमाईच्या मूर्तीची पूजा आषाढी एकादशीला राजकीय पुढारी व्यक्तींच्या हस्ते केली जाते.

मुंबईतील प्रसिद्ध मंदिरांपैकी हे एक विठ्ठल रुक्मिणी मंदिर. मंदिर पुरातन असून जवळ जवळ ४०० वर्षे जुने आहे. या मंदिराच्या स्थापनेविषयाची गोष्ट ऐकण्यासारखी आहे. पूर्वी मुंबई हि सात बेटांची होती. त्यातील वडाळा हे एक बेट किंवा गांव. वडाळा गांव हे प्रसिद्ध होते, ते येथील मिठागरांसाठी. अशा या मिठागरात लमाणी, शेतकरी, कोळी, आगरी अशी अनेक लोक राहत होते. मिठाचा व्यापार करणे या त्यांचा व्यवसाय. व्यापार करणारे व्यापारी हे विठ्ठलाचे आणि तुकाराम महाराजांचे भक्त असून ते नित्यनियमाने वारीला पंढरपूरला जात असे. एक दिवशी काम करताना या मिठागरात काम करणाऱ्या विठ्ठल-रखुमाईच्या मूर्ती सापडल्या.

सदर घटना व्यापाऱ्यांनी पंढरपुरास जाऊन तुकाराम महाराजांना सांगितली असे म्हणणे आहे, त्यांनी सांगितले या मुर्त्या ज्या ठिकाणी सापडल्या त्या ठिकाणी विठ्ठल-रखुमाईचे मंदिर स्थापन करा. व्यापाऱ्यांनी त्या परिसरात एक तळ होतं तेथे मंदिर उभारले. मंदिराचा विकास होत गेला तस तसे या मंदिराचा पाय रचत गेला. आणि आज या मंदिरात गेल्यावर समाधान मिळाल्याशिवाय बाहेर येऊच शकत नाही. ही खरी मंदिराची ख्याती आहे. म्हणून हे विठ्ठल रुक्मिणी मंदिर "श्री. प्रतिपंढरपूर " तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते.

- ९८३३५५७०४४

# विठू माझा लेकुरवाळा, संगे गोपाळांचा मेळा !

रमेश लांजेवार
नागपूर

पांडुरंग हे विष्णुचा अवतार आहे.त्यामुळे ते संपूर्ण सृष्टीचे पालनहार आहेत.परंतु महाराष्ट्रातील मराठी माणसासाठी विष्णू हे पांडुरंगाच्या (विठ्ठलाच्या) रूपात खरं तर महाराष्ट्राचे कुल दैवत आहे.आषाढ महिना हा विठ्ठलाच्या गजरात तल्लीन असतो.जनुकाय साक्षात विठ्ठल प्रगट झाल्याचे आपल्याला संपूर्ण महाराष्ट्रात दिसुन येते. महाराष्ट्रातील संतांच्या हृदयात स्थान असणारे अवघ्या महाराष्ट्राचे दैवत म्हणजे पंढरपूरचा विठूराया.



मराठी वर्षांच्या आषाढ महिन्याच्या शुद्ध पक्षात जी एकादशी येते तिला आषाढी किंवा देवशयनी एकादशी असेही म्हणतात.याच एकादशीला महाएकादशी असेही म्हणतात. त्यामुळे या एकादशीला घरातील प्रत्येक लहान-मोठे व्यक्ती उपवास करून विठुरायाच्या चरणी पुजा-अर्चना करून नतमस्तक होऊन आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी आराधना करतात.वषार्तील एकूण २४ एकादशी पैकी आषाढी एकादशीला आगळेवेगळे महत्व आहे.कारण याच एकादशीला महाराष्ट्रातील लाखो भाविक,वारकरी वारी घेऊन पंढरपूरला जातात व प्रत्येकांना वाटते की जीवनात एकदा तरी वारी अनुभवावी म्हणजे आपण समजू शकतो की वारीचे दर्शन म्हणजे साक्षात पांडुरंगाचे दर्शन. महाराष्ट्राला संतांची भूमी संबोधले जाते.कारण महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत मुक्ताबाई यांच्या सारख्या महान संतांनी संत परंपरेचा वारसा जोपासला आहे. कोणी लहान नाही,कोणी मोठा नाही, सगळे समान व सारखे अशी समतेची भावना सर्व संतांनी लोकांच्या मनात रूजवीली आहे.

त्यामुळेच आज संपूर्ण भारतात महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते. आजही संपूर्ण महाराष्ट्रात संतांचा वारसा दिसून येतो. ही महाराष्ट्रासाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे. असेही म्हणतात की आषाढी एकादशी पासून चातुमार्साची सुरूवात होते व आषाढी एकादशीला भगवान विष्णू शेष नागावर निद्रास्थ होतात आणि चातुमार्सानंतर कार्तिकेय एकादशीला जागे होतात. आषाढी एकादशीला आळंदीवरून ज्ञानेश्वराची, देहू वरून तुकारामाची, त्र्यंबकेश्वर येथुन संत निवृत्तीनाथांची, उत्तर भारतातून संत कबीर यांची,तर पैठणवरून एकनाथ महाराजांची पालखी पंढरपूरला विठोबाच्या दर्शनासाठी येतात. या पालख्यांबरोबर सर्व भाविक पायी विठू नामाचा गजर करत पंढरपूरला पोहचतात.

एकादशीच्या दिवशी भाविक पहाटे उठून चंद्रभागेच्या तीरी स्नान करतात व तुळस वाहून विठ्ठलाची पुजा-अर्चना करतात.विठ्ठल म्हणजे साक्षात विष्णूचाच अवतार आहे.विठ्ठलाच्या चरणी मस्तक ठेवुन संपूर्ण भाविक मानवजातीच्या कल्याणासाठी आणि येणारे विघ्न दूर व्हावे यासाठी साकडे घालतात व राज्य सुजलाम सुफलाम होण्याची मनोकामना करतात. पौराणिक कथांमध्ये सुध्दा आषाढी एकादशीचा उल्लेख दिसून येतो.मृदुमान्य नावाच्या एका राक्षसाने भगवान शंकराची उपासना करून त्यांना प्रसन्न केले व मला मरण येणार नाही असा वर शंकरजी जवळुन मागुन घेतला.अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने संपूर्ण देवतांवर विजय मिळविण्याचा निश्चय केला.अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा,विष्णू आणि महेश यांचा शोध घेणे सुरू केले. अशावेळी ब्रम्हा, विष्णू, महेश एका गुहेत तीन दिवस लपून बसले.या तिघांच्या एकवटलेल्या श्वासापासुन "एकादशी देवता" उत्पन्न झाली व तिने मृदुमान्य राक्षसाचा वध केला.

हीच ती आषाढी एकादशी होय. या दिवसांपासून चातुर्मास सुरू होतो. असा उल्लेख आपल्याला पुराणांमध्ये पहायला मिळते. विदर्भाचे पंढरपूर म्हणून धापेवाड्याची २८५ वर्षांची ओळख आहे. आजही आपल्याला आषाढी एकादशी पासून तर गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी पर्यंत (आखाडीच्या दुसऱ्या दिवसांपर्यंत) धापेवाड्याला भव्य यात्रा दिसून येते. धापेवाड्याचे पांडुरंगाचे परमभक्त श्रीसंत कोलबाजी महाराज दरवर्षी पंढरपूरची वारी करून पांडुरंगाचे दर्शन घ्यायचे. त्यानंतर वृद्धापकाळाने कोलबाजी महाराज पंढरीची वारी करून शकले नाही याची खंत त्यांना वाटु लागली.ते विठ्ठलाचे परमभक्त असल्याने पांडुरंगाला आपल्या परमभक्ताची चिंता वाटायला लागली.अशा परिस्थितीत पांडुरंग श्रीसंत कोलबाजी महाराज यांच्या स्वप्नात येऊन पांडुरंगाने सांगितले की हे माज्या परम भक्ता तु माज्या पर्यंत येवू शकत नाही हे मला समजते. त्यामुळे मी स्वतः तुझ्या भेटीसाठी धापेवाड्याला येत आहे. असे पांडुरंगाचे बोलने ऐकुण श्रीसंत कोलबाजी महाराजांनी स्वतःला धन्य मानले व पांडुरंग धापेवाडास्थीत चंद्रभागेच्या काठाच्या विहीरीत स्वयंभू विठ्ठलमूर्तीच्या रूपात गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे आषाढी पौर्णिमेच्या प्रतिपदेला प्रकट झाले. अशी आख्यायिका आहे.

दरवर्षी आषाढ महिन्यात एकादशीच्या पाचव्या दिवशी म्हणजे गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी धापेवाड्याला साक्षात पांडुरंग येतात.त्यामुळे धापेवाड्याला पांडुरंगाच्या दर्शनासाठी गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी भक्तांची भव्य यात्रा आपल्याला पहायला मिळते.देवतांवर विजय मिळविण्यासाठी मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा,विष्णू, महेश यांचा शोध घ्यायला सुरुवात केली.अशा परिस्थितीत हे तिन्ही देवता एका गुहेत तीन दिवस लपून बसले.यांच्या श्वासातून एकादशी देवता निर्माण झाली व मृदुममान्य राक्षसाचा वध केला.असे पुराणात आहे.हीच गोष्ट आज आपल्याला लागू होते.आज पृथ्वीवरील संपूर्ण जीवजंतूसाठी श्वास (ऑक्सिजन) ची जोपासना करणे गरजेचे आहे यासाठी वृक्ष लागवड अत्यंत आवश्यक आहे. आज महाराष्ट्र अनेक दऱ्या, डोंगर व बंजार जमीन आहे.या संपूर्ण ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे. आपण पहाल की करोना काळात संपूर्ण जग ऑक्सिजनसाठी धडपडत होते. म्हणजे ऑक्सिजनला किती महत्त्व आहे ते आपल्याला करोनाने चांगल्याप्रकारे शिकविले. याकरीता पृथ्वीला व पृथ्वीवरील जीवसृष्टीला वाचविण्यासाठी सावधगिरीचे उपाय म्हणून घर तीथेच झाड,बंजार जमीन, गडकिल्ले या संपूर्ण ठिकाणी आषाढी एकादशीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी. यासाठी मुख्यत्वेकरून सरकारने, सर्वसामान्यांनी, सरकारी अधिकाऱ्यांनी, राजकीय पुढाऱ्यांनी, सामाजिक संघटनांनी पुढाकार घेऊन वृक्षलागवडीला महत्त्व दिले पाहिजे.यामुळे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. कारण आज जंगल संपदा वाचविने काळाची गरज आहे. कारण प्रत्येक झाडात,पानांत, फुलात व फळात आपल्याला खऱ्या अर्थाने विठ्ठलाचे दर्शन घडल्याचे दिसून येईल.त्यामुळे आता सर्वांनीच वृक्ष लागवड करून काय डोंगर, काय झाडी, काय हिरवळ गालीचा सम्द ओके करून प्रदूषणावर मात करायला हवी.

जय हरी विठ्ठल ! पांडुरंग हरी !

- स्वतंत्र पत्रकार
९९२१६९०७७९